१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, बुधवार २२ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४८, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 48 Marathi - Daily - Mumbai, 22 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

navakal.in

१७ लाख सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर!

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# देशात रेकॉर्ड होईल इतके मतदान करा

## बारामतीतील सभेत फडणवीसांचे आवाहन

■ बारामती



**अजित पवार यांच्या मृत्यूनंतर बारामतीत होत असलेल्या पोटनिवडणुकीच्या प्रचाराची विशेष सांगता सभा आज पार पडली. या सभेला सर्वपक्षीय ज्येष्ठ नेते उपस्थित होते. या सभेत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बारामतीतील मतदारांना आवाहन केले की, अजितदादांचे स्वप्न पूर्ण करण्याची सगळी क्षमता सुनेत्रा वहिनींमध्ये आहे. पण काही लोकांमुळे ही निवडणूक बिनविरोध होत नाही. मात्र अजितदादांवरील तुमचे प्रेम दाखवण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली आहे. देशात रेकॉर्ड होईल इतके मतदान करून सुनेत्रा पवारांना निवडून द्या. याशिवाय अजितदादांच्या अपघाताचे सगळे सत्य बाहेर आणल्याशिवाय राहणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.**

**बारामतीतील** शारदा प्रांगणात झालेल्या प्रचाराच्या या सभेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, केंद्रिय मंत्री राज्यमंत्री रामदास आठवले, हर्षवर्धन पाटील, शिवसेना शिंदे गटाचे उदय सामंत आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. या सभेला बारामतीकरांचीही मोठी उपस्थिती होती. सभास्थळी अजित पवार यांचे फोटो आणि मोठे फलक लावण्यात आले होते. ते पाहून कार्यकर्ते भावुक होत होते.

या सभेत अजित पवार यांच्या आठवणी जागवत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमच्यासाठी ही निवडणूक नसून हा अजितदादांच्या स्मृतींचा यज्ञ सुरू आहे. त्यात आपली आहुती दिली नाही तर काहीतरी राहून गेले असे वाटले असते. म्हणून ती आहुती टाकण्यासाठी आणि दादांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी मी इथे आलो आहे. दादांच्या पश्चात आपले दुःख बाजूला ठेवून वहिनींनी पक्षाची धुरा सांभाळली. स्वतःचे दुःख महत्त्वाचे नाही, तर जनतेचा विश्वास आणि कर्तव्य अधिक महत्त्वाचे असते हे लक्षात घेऊन सुनेत्रा वहिनींनी जबाबदारी हातात घेतली आहे. इतके वर्ष सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुनेत्राताईंनी काम केले आहे. दादांना साथ देत राजकारणदेखील जवळून त्यांनी बघितले आहे. दादांची स्वप्न पूर्ण करण्याची सगळी क्षमता ही सुनेत्रा पवारांमध्ये आहे. त्यांच्या रूपाने महाराष्ट्राला उपमुख्यमंत्रीच नाही तर सक्षम नेतृत्व लाभले आहे. महाराष्ट्राच्या विकास यात्रेत अजितदादांनी मोठे योगदान दिले. अजितदादांचे निघून जाणे हे केवळ कुटुंबाचे नुकसान नाही, तर हे या अखिल महाराष्ट्राचे नुकसान आहे. अजितदादांनी सुरू केलेले सगळे प्रकल्प सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वात पूर्ण केले जातील. मला अतिशय जवळून दादांसोबत काम करण्याची संधी मिळाली. आम्ही विरोधातही काम केले. गुण ग्राहकता हे त्यांचे वैशिष्ट्य होते. सरकारी काम सर्वोत्तम दिसले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असे. आज मागे वळून पाहताना त्यांनी बारामतीत केलेली अनेक कामे दिसतील. बारामतीला » पान ७ वर

# राज्यातील सरकारी कर्मचारी, नर्स बेमुदत संपावर! कामकाज ठप्प

**जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदांची भरती, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण यांसह विविध मागण्यांसाठी राज्यातील सरकारी, निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, नर्स यांनी आजपासून बेमुदत संप सुरू केला. त्यामुळे अनेक ठिकाणी कामकाज ठप्प झाले. हिंगोली, सातारा, सांगली, परभणी, ठाणे, धुळे, रत्नागिरी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, रायगड आणि सोलापूर जिल्ह्यांतील हजारो कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले.**



■ मुंबई

**हिंगोली** जिल्ह्यात सुमारे ७ हजार कर्मचारी संपात सहभागी झाले. त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणाबाजी केली. परभणीत १५ ते १८ हजार कर्मचारी संपात उतरले. त्यामुळे शासकीय कार्यालयांमध्ये शुकशुकाट होता. सांगलीत कर्मचाऱ्यांनी कामबंद करत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. मुंबईतील जे. जे. रुग्णालयातील परिचारिका आणि इतर कर्मचारीही या संपात उतरले होते. तर छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालय तसेच ठाणे, पुणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील मनोरुग्णालयांतील कर्मचारीही संपात सहभागी झाले. जोगेश्वरीतील ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयात १३० हून अधिक कंत्राटी कामगारांनीही थकीत वेतन आणि पीएफच्या मागण्यांसाठी आंदोलन सुरू केले. त्यामुळे रुग्णसेवेवर परिणाम झाला. ठाणे जिल्ह्यात संपामुळे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि इतर शासकीय कार्यालयांतील कामकाज ठप्प झाले. प्रमाणपत्रे, महसूल कामे आणि शासकीय योजनांशी संबंधित सेवा विस्कळीत झाल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागला.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी मागील १५ महिन्यांपासून शासनाच्या भूमिकेवर नाराज आहेत. सात वेळा आंदोलन करूनही » पान ७ वर

## ट्रम्प टॅरिफचे १६६ अब्ज डॉलर परत करणार

**वॉशिंग्टन -** अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने टॅरिफला घटनाबाह्य ठरवल्यानंतर आता ट्रम्प सरकारने देशांना टॅरिफ रिफंड करण्यास सुरुवात केली. यूएस कस्टम्स अँड बॉर्डर प्रोटेक्शनने ऑनलाईन पोर्टल सुरू केले. अमेरिकेच्या इतिहासातील हा सर्वात मोठा शुल्क परतावा मानला जात आहे. ज्यामध्ये १६६ अब्ज डॉलर (१३.८ लाख कोटी रुपये) परत केले जाणार आहेत. सुरुवातीला केवळ काही विशिष्ट 'अनलिक्विडेटेड' नोंदी म्हणजेच शेवटच्या हिशोबानंतर ८० च्या आत आलेल्या नोंदीच पात्र टॅरिफ परताव्याची पात्र ठरतील. ६०-९० दिवसांत पैसे मिळतील. परतावा मिळवण्यासाठी इंपोर्टर ऑफ रेकॉर्ड आणि अधिकृत कस्टम ब्रोकर्सना पोर्टलवर नोंदणी करावी लागेल आणि बँक खात्याचे तपशील द्यावे लागतील.

## शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल

**मुंबई -** ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालय येथे उपचार सुरू आहेत. त्यांच्या काही वैद्यकीय तपासण्या करण्यात येत आहेत. त्या पूर्ण झाल्यानंतरच त्यांच्या प्रकृतीबाबत अधिक माहिती मिळणार असल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. यामुळे ते बारामती पोटनिवडणुकीसाठी मतदान करणार नसल्याचे त्यांनी पोस्टद्वारे स्पष्ट केले. गेल्या महिन्यातही शरद पवार यांची प्रकृती अचानक बिघडली होती.

**महाराष्ट्रात एसआयआर म्हणजे मतदार पडताळणी होणार आहे. त्यावेळी कोणती कागदपत्रे सादर करायची, कोणते ॲप डाऊनलोड करायचे याची सविस्तर माहिती जाणून घ्या.**

**२३ एप्रिलच्या 'नवाकाळ' अंकात झीनत शबरीन यांची विशेष मुलाखत वाचा**

**आपला अंक राखून ठेवा**

## मराठी भाषा अनिवार्य करण्याला विरोध

## रिक्षाचालकांचे ४ मे पासून आंदोलन

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी ४ मे पासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे महाराष्ट्र सरकारने १ मे २०२६ पासून रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या चालकांना मराठी बोलता, लिहिता किंवा वाचता येणार नाही, त्यांचे परवाने रद्द केले जातील अशी शक्यता असल्याने चालक संघटनांनी याला विरोध दर्शवला आहे.

ऑटो रिक्षा चालक-मालक संयुक्त कृती समितीने जाहीर केले की, २८ एप्रिलपर्यंत राज्य परिवहन विभागाने हा आदेश मागे घेतला नाही तर ४ मेपासून बाजारपेठा, रेल्वे स्थानके, बस डेपो, निवासी तसेच व्यापारी भागात दररोज निदर्शने करण्यात येतील. राज्यात १५ लाख ऑटो रिक्षा व टॅक्सी परवानाधारक असून, त्यापैकी २.८ लाख वाहने मुंबई महानगर क्षेत्रात आहेत. या निर्णयामुळे लाखो कुटुंबांवर परिणाम होईल, असा इशाराही संघटनांनी दिला आहे. २८ एप्रिल रोजी परिवहन मंत्र्यांना सामूहिक निवेदन देण्यात येणार आहे.

संघटनेचे अध्यक्ष शशांक शरद राव यांनी सांगितले की, महाराष्ट्रात राहणारा प्रत्येक व्यक्ती मराठीच आहे. प्रवाशांशी मूलभूत संवाद साधणे पुरेसे आहे. चालक आधीच पोलीस पडताळणी, निवासी » पान ७ वर

## बेकारीने मरण्यापेक्षा दुबईत मरू

## कामगार संकटात! उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

■ मुंबई



**उबाठाचे** प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज भाजपावर कडाडून हल्ला चढवला. उद्धव ठाकरे म्हणाले की, आज इराण-अमेरिका, इस्त्रायल युद्ध सुरू आहे. दुबईवर बॉम्बफेक झाली. तिथे बिहार व उत्तर प्रदेशातील अनेक लोक काम करतात. सरकारने त्यांना मायदेशी परत येण्याचे आवाहन केले. पण त्यांनी ते धुडकावून लावले. आम्ही भारतात येऊन बेकारीने मरण्यापेक्षा इकडे बॉम्ब हल्ल्यात मेलो तरी चालेल असे ते म्हणाले. ही वास्तविकता आहे. ती येथील राज्यकर्त्यांच्या लक्षात कधी येणार की नाही. या लोकांना फक्त राज्य व सत्ता पाहिजे.

भारतीय कामगार सेनेच्या कार्यक्रमात आज उद्धव ठाकरे बोलत होते. त्यावेळी ते म्हणाले की, कामगार म्हणजे या देशाचा भाग्यविधाता नाही काय? आजपर्यंत जे जे लढे झाले त्या सर्वांत कामगार उतरला नसता, तर कदाचित आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य लांबले असते आणि संयुक्त महाराष्ट्राचा लढाही यशस्वी झाला नसता. कारण, गिरणी कामगार व कामगारांच्या लढ्यामुळे » पान ७ वर

## भोंदू खरातची ३२ बनावट खाती

## ५७ लाखांची लूट! पोलिसांची प्रेस

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदू अशोक खरातच्या अडचणीत वाढ झाली आहे. सिन्नरमध्ये त्याच्याविरोधात आणखी एक गुन्हा नोंद झाला. जगदंबा ग्रामीण बिगर शेती पतसंस्थेत तक्रारदाराच्या नावावर ३२ बनावट खाती उघडल्याचा प्रकार उघडकीस आला. या खात्यांद्वारे तब्बल ५७ लाख ९० हजारांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अशोक खरातसह पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल झाल्याची माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी पत्रकार परिषदेतच दिली.

बाळासाहेब पाटील म्हणाले की, नाशिकच्या सिन्नर येथे जगदंबा माता बिगर शेती ग्रामीण पतसंस्था आहे. या पतसंस्थेत ३२ जणांच्या नावावर खाती उघडण्यात आली. मात्र खरातने त्यांच्या नावावर खाती उघडली आहेत याची संबंधितांना कोणतीही माहिती नव्हती. या प्रकरणासंदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे अहिल्यानगर येथून प्राप्त झाली. संबंधित खातेदारांना समक्ष चौकशीसाठी बोलावण्यात आले. तपासादरम्यान या खात्यांमधून किती व्यवहार झाले, खाती नेमकी कधी उघडली गेली, व्यवहारांबाबतचे संदेश कोणत्या क्रमांकांवर जात होते याची सखोल चौकशी केली जाणार आहे.




हाफकिन इन्स्टिट्यूट परळ या संस्थेच्या खासगीकरणाच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण कामगार सेनेच्या वतीने हाफकिन इन्स्टिट्यूटच्या बाहेर तीव्र आंदोलन करण्यात आले. (छाया - दीपक साळवी)

## इराण-अमेरिका दुसऱ्या फेरीतील चर्चा अधांतरीच

■ इस्लामाबाद

**पाकिस्तानचे** पंतप्रधान शाहबाज शरीफ यांच्या मध्यस्थीने होणार असलेल्या इराण-अमेरिका युद्धविरामाच्या दुसऱ्या फेरीतील चर्चेबाबत संभ्रम आजही कायम राहिला. अमेरिकेच्या प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व करणारे उपाध्यक्ष जे डी व्हान्स आज इस्लामाबादमध्ये दाखल होणार होते. ते आज आलेच नाहीत. ते उद्या येणार असे संध्याकाळी सांगण्यात आले. दुसरीकडे इराणचे शिष्टमंडळ चर्चेसाठी येणार की नाही याबद्दलही काही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

आज होणारी चर्चा आता उद्या होणार आहे, अशी चर्चा आहे. दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला धमक्या देण्याचे सत्र आजही सुरूच ठेवले. आज दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची मुदत संपत असल्याने ट्रम्प यांनी पुन्हा एकदा इराणला धमकावले. इराण जर शांतता चर्चेत सहभागी झाला नाही तर युद्धविरामाची मुदत संपल्यानंतर इराणवर आणखी बॉम्बहल्ले केले जातील, » पान ७ वर

# ॲपल सीईओ पदाचा टिम कुकचा राजीनामा

## आता कार्यकारी अध्यक्ष



**ॲपलचे सीईओ टिम कुक यांनी जवळपास १५ वर्षे सेवेनंतर आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. हार्डवेअर इंजिनिअरिंग प्रमुख जॉन टर्नस हे नवे सीईओ असतील. ते आता ॲपल कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष होणार आहेत.**

■ वॉशिंग्टन

२०११ **मध्ये** ॲपलचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्याकडून सूत्रे हाती घेतल्यानंतर कुक यांनी कंपनीच्या वाढीत मोठी भूमिका बजावली. आता त्यांची जागा हार्डवेअर इंजिनिअरिंग प्रमुख जॉन टर्नस घेणार आहेत. टिम कुक १ सप्टेंबर २०२६ पर्यंत सीईओ म्हणून कार्यरत राहतील आणि त्यानंतर ॲपलच्या बोर्डवर कार्यकारी अध्यक्ष म्हणून भूमिका स्वीकारतील. कुक यांच्या नेतृत्वाखाली ॲपलने अभूतपूर्व यश मिळवले. ॲपल वॉच सारखी नवी उत्पादने आणि ॲपल म्युझिक व ॲपल टीव्ही प्लस सारख्या सेवा सुरू केल्या. २०१८ मध्ये कंपनीने अमेरिकेत प्रथमच १ ट्रिलियन डॉलरचा बाजारमूल्याचा टप्पा गाठला आणि २०२२ पर्यंत तो ४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचला. कुक यांनी सीईओ पद स्वीकारले तेव्हा ॲपलचे बाजारमूल्य ३५० अब्ज डॉलर होते. ॲपल » पान ७ वर

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## उमर खालिदची फेरविचार याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

■ नवी दिल्ली

२०२० **च्या** दिल्ली दंगलींप्रकरणी अटकेत असलेला जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचा माजी विद्यार्थी उमर खालिद याची फेरविचार याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. आपला जामीन अर्ज फेटाळण्याच्या न्यायालयाच्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी विनंती खालिद याने याचिकेद्वारे केली होती. न्या. अरविंद कुमार आणि न्या. एन व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठासमोर खालिदच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी तपास यंत्रणेने खालिदवर ठेवलेले आरोप अत्यंत गंभीर स्वरुपाचे असून या आरोपांमध्ये प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे आढळून येत आहे, असे निरीक्षण खालिदची फेरविचाराची विनंती नाकारताना न्यायालयाने नोंदवले. फेब्रुवारी २०२० मध्ये केंद्र सरकारच्या नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या (सीए) विरोधात करण्यात आलेल्या आंदोलनाचे दंगलींमध्ये रुपांतर होऊन पन्नासहून जास्त जणांचा बळी गेला होता. तर शंभरहून अधिक जखमी झाले होते.

## दिशा सालियनच्या वडिलांच्या वकिलावरील कोर्टाचा अवमान खटला चालू राहणार

■ नवी दिल्ली

**बॉलिवूड** अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिचे वडील सालियन यांचे वकील निलेश ओझा यांच्यावर न्यायव्यवस्थेवर गंभीर आरोप केल्या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात चालू असलेला अवमान खटला मागे घेण्याची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे निलेश ओझा यांच्यावरील न्यायालयाचा अवमान केल्याचा खटला चालू राहणार आहे.

दिशा सालियन हिचा जून २०२० मध्ये संशयास्पद मृत्यू झाला होता. दिशाने आत्महत्या केल्याचा निष्कर्ष काढून या प्रकरणाचा तपास



बंद करण्यात आला होता. मात्र दिशाचे वडील सतिश सालियन यांनी तिची हत्या झाल्याचा आरोप करत सीबीआय चौकशीची मागणी करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. या याचिकेत शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांचे नाव घेऊन गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान वकील ओझा यांनी पत्रकार परिषद घेऊन सुनावणी घेणाऱ्या न्यायाधीशांवर लाचखोरीचे आरोप केले होते. त्याची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या विरोधात न्यायालयाची बेअदबी केल्याचा खटला दाखल केला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला वकील ओझा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

# गोखले उड्डाणपुलाखाली सुशोभिकरण २.६८ कोटींचा पालिकेचा प्रस्ताव

**आज स्थायी समितीच्या बैठकीत सादर होणार**

■ मुंबई

**अंधेरी** येथील गोखले उड्डाणपुलाखालील जागा सुंदर आणि उपयुक्त बनवण्यासाठी महापालिका प्रशासनाने २ कोटी ६८ लाख ६५ हजार ९८५ रुपये अंदाजित खर्चाचा प्रस्ताव तयार केला आहे. यात सुशोभिकरण, आकर्षक रोषणाई आणि सुयोग्य पार्किंगची तरतूद आहे, यामुळे उड्डाणपुलाखालील जागेचा गैरवापर टळून परिसराचे सौंदर्य



वाढणार आहे. हा प्रस्ताव उद्या बुधवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर केला जाणार आहे.

या गोखले उड्डाणपुलाखाली साईवाडी जंक्शन, जिवा महाले रोड ते ना.सी.फडके रोड येथे हे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. पालिका त्यासाठी २ कोटी ६८ लाख ६५ हजार ९८५ रुपये खर्च करणार आहे. पालिका आयुक्तांनी मुंबईतील रस्त्यांचे पुनर्पृष्ठीकरण, रस्ता दुभाजकांचे सु शो भि क र ण, प द प था चे सुशोभिकरण आणि सुधारणा,इत्यादी बाबींवर भर दिला आहे.त्याचाच एक भाग म्हणुन या गोखले उड्डाणपुलाखालील रस्ता आणि परिसराचे सुशोभिकरण केले जाणार आहे.

# सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या समाधी दिनानिमित्त भव्य कार्यक्रम

■ कवठे यमाई



**पुणे** जिल्ह्यातील शिरूर (घोडनदी) येथे चैतन्य सद्गुरू योगीराज श्री शंकर महाराज यांच्या ७९ व्या समाधी दिनानिमित्त शुक्रवार २४ एप्रिल रोजी भक्तिभावाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने सायंकाळी ५ वाजता भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता श्रींच्या पोथी वाचनाचा कार्यक्रम होणार असून, रात्री ८ वाजता श्रींची आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे. हा कार्यक्रम तिळवण तेली समाज मारुती मंदिर, मुंबई बाजार, शिरूर (घोडनदी), जि. पुणे येथे संपन्न होणार आहे.

# आज मुंबईचा पाणीपुरवठा तब्बल १८ तास बंद राहणार



■ मुंबई

**मुंबईच्या** दक्षिण आणि मध्य भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी पालिकेने शिवडी येथे महत्त्वाचे तांत्रिक काम हाती घेतले आहे. शिवडी येथील हाजी बंदर मार्गावर १,५०० मिमी व्यासाचे दोन नवे 'बटरफ्लाय व्हॉल्व' बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे उद्या बुधवार २२ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजल्यापासून गुरुवार २३ एप्रिल पहाटे चारपर्यंत म्हणजे जवळपास १८ तास मुंबईतील ए,बी,सी, ई व एफ-दक्षिण या पाच विभागांतील पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

प्रामुख्याने 'ए' विभाग विभागातील पी.डिमेलो मार्ग परिसर, सीएसएमटी, सेंट जॉर्ज रुग्णालय, आरबीआय परिसर आदी ठिकाणी २२ एप्रिल रोजी पाणीपुरवठा बंद राहील,तर 'बी' विभागातील उमरखाडी, चिंचबंदर, मशीद बंदर, नूरबाग, वालपाखाडी, कारागृह मार्ग यांसह विविध भागांत २२ व २३ एप्रिल रोजी वेगवेगळ्या वेळांना पाणीपुरवठा बंद राहील.'सी' विभाग विभागातील बोरा बाजार,मशीद परिसर, पाकमोडिया स्ट्रीट आदी भागांत मात्र २३ एप्रिल रोजी पाणीपुरवठा बंद राहील.

# रेल्वे वेळापत्रक बदल! ४ गाड्या रद्द तर गुरुवारी विशेष ब्लॉक

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या भुसावळ विभागात गुरुवारी दुरुस्ती आणि देखभाल कामांसाठी विशेष ब्लॉक घेण्यात येणार असल्याने रेल्वे वेळापत्रकात मोठे बदल करण्यात आले आहेत. महाराष्ट्र एक्स्प्रेस दोन तासांहून अधिक उशिराने धावणार असून चार प्रवासी गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासापूर्वी वेळापत्रक तपासण्याचे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या विशेष ब्लॉकमुळे भुसावळ-वर्धा मेमू, बडनेरा-भुसावळ मेमू, भुसावळ-बडनेरा मेमू आणि वर्धा-भुसावळ मेमू या चार गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. या गाड्यांवर दररोज प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांना त्यामुळे पर्यायी व्यवस्था करावी लागणार आहे. तसेच गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्स्प्रेस काटेपूर्णा ते शेगावदरम्यान सुमारे दोन तास वीस मिनिटे उशिराने धावणार आहे. याशिवाय ओखा-पुरी गाडी शेगाव ते श्री क्षेत्र नागझरीदरम्यान सुमारे २ तास पंचवीस मिनिटे उशिराने धावेल.

# ठाण्यात विषय समित्यांना विलंब! भाजपा आ. केळकरांची शिंदे सेनेवर टीका

■ ठाणे

**तीन** महिन्यांपूर्वी झालेल्या ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत शिंदे शिवसेना आणि भाजपा महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. मात्र निवडणुकीनंतरही महापालिकेतील स्वीकृत नगरसेवक नियुक्तीसह स्थायी समिती, शिक्षण मंडळ, परिवहन समिती तसेच इतर विषय समित्या अद्याप गठीत झालेल्या नाहीत. या विलंबाला शिंदे शिवसेना जबाबदार असल्याची अप्रत्यक्ष टीका भाजपा आमदार संजय केळकर यांनी केली. हा प्रश्न आमच्या मित्रपक्षांचाच आहे. आम्ही याबाबत अनेकदा बोललो आहोत, अशी प्रतिक्रिया आमदार केळकर यांनी दिली.

ठाणे पालिकेतील भाजपाच्या नवीन पक्ष कार्यालयाचे उद्घाटन नुकतेच आमदार केळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार केळकर बोलत होते. ते पुढे म्हणाले की, ठाणे शहरातील वाढत्या समस्या आणि विविध विकास प्रकल्पांबाबतचे निर्णय हे लोकशाहीच्या माध्यमातून घेतले गेले पाहिजेत. त्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींना काम करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. पालिकेतील समित्या गठीत करण्याबाबत आमच्या बाजूने कोणताही अडथळा नाही आणि अडवण्याचेही काही कारण नाही.

# खा. संजय राऊत मानहानी प्रकरणी नितेश राणेंना पुन्हा जामीनपात्र वॉरंट



■ मुंबई

**उबाठाचे** खासदार संजय राऊत यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या फौजदारी तक्रारीप्रकरणी माझगाव न्यायालयाने नितेश राणे यांच्याविरुद्ध पुन्हा जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. या प्रकरणात नितेश राणे यांचा जबाब नोंदवायचा असल्याने त्यांची न्यायालयातील उपस्थिती आवश्यक होती. मात्र, ते वारंवार सुनावणीस अनुपस्थित राहत असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

यापूर्वीही नितेश राणे यांच्याविरुद्ध दोनदा जामीनपात्र आणि एकदा अजामीनपात्र वॉरंट बजावण्यात आले होते. मात्र, न्यायालयात हजर राहिल्यानंतर ते रद्द करण्यात आले होते, अशी माहिती राऊत यांच्या वकिलांनी न्यायालयात दिली. हे प्रकरण खासदार आणि आमदाराशी संबंधित असल्याने, सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार याची सुनावणी जलदगतीने होणे आवश्यक असल्याचा युक्तिवादही करण्यात आला. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना सांगितले की, नितेश राणे यांचे वकील उपस्थित राहत असले तरी, त्यांचा प्रत्यक्ष जबाब नोंदवणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनी स्वतः हजर राहणे गरजेचे असल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने जामीनपात्र वॉरंट काढले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १० जून रोजी आहे.

# भाजपा संपवायला चाललेले मुश्रीफ 'गोकुळ' मध्ये आपल्यासोबत नको

■ कोल्हापूर

**जिल्ह्यातील** चंदगडचे भाजपा समर्थक अपक्ष आमदार शिवाजी पाटील यांनी 'गोकुळ' दूध संघाच्या राजकारणावरून महायुतीतील सहकारी आणि मंत्री हसन मुश्रीफ यांच्या विरोधात अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. भाजपा संपवायला निघालेले मुश्रीफ गोकुळमध्ये आपल्यासोबत नको, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे.

विशेष म्हणजे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेतलेल्या भाजपा पदाधिकाऱ्यांच्या बैठकीतच त्यांनी आपली ही भूमिका बोलून दाखवली. हसन मुश्रीफ यांनी मात्र शिवाजी पाटलांच्या आरोपांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या नाराजीनंतर मंत्री

**भाजपा समर्थक आमदार शिवाजी पाटलांची भूमिका**

चंद्रकांत पाटील यांनी तातडीने आमदार शिवाजी पाटील तसेच भाजपाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीतही आमदार शिवाजी पाटील यांनी भाजपा संपवायला निघालेले हसन मुश्रीफ गोकुळमध्ये आपल्यासोबत नको, अशी स्पष्ट भूमिका घेतल्याचे समजते. शिवाजी पाटील यांच्या भूमिकेला भाजपामधील काही पदाधिकाऱ्यांनी समर्थन दिल्याने चंद्रकांत पाटीलदेखील हतबल झाले. लवकरच याबाबत पुन्हा बैठक घेऊ. मात्र,तोपर्यंत महायुतीमध्ये वाद निर्माण होतील, अशी वक्तव्य कोणीही करू नका, अशी सक्त सूचना चंद्रकांत पाटील यांनी भाजपा पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

दरम्यान,मुश्रीफ यांनी 'काँग्रेस'शी हातमिळवणी करून जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीत भाजप व शिंदेसेनेचे उमेदवार पाडले.

# मुंबई विमानतळावर ७ मे रोजी मेगाब्लॉक

■ मुंबई



**पावसाळ्याच्या** काळात विमान प्रवास अधिक सुरक्षित व्हावा आणि तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सीएसएमआयए दोन्ही धावपट्ट्या ७ मे २०२६ रोजी पावसाळापूर्व देखभालीसाठी सहा तास बंद ठेवण्यात येणार आहेत. सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५ या वेळेत मुख्य धावपट्टी आणि दुय्यम धावपट्टीवरून कोणतीही उड्डाणे होणार नाहीत.

दरवर्षी ही देखभाल मोहीम राबवली जाते. या नियोजित कामामुळे प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी विमानतळ प्रशासनाने सहा महिने आधीच एअरलाईन्स आणि इतर घटकांशी समन्वय साधला आहे, जेणेकरून त्यांना आपल्या विमान वेळापत्रकात योग्य बदल करता येतील. या सहा तासांच्या कालावधीत १०३३ एकरमध्ये पसरलेल्या एअरसाइड इन्फ्रास्ट्रक्चरची पाहणी केली जाईल.

# संसद,विधानसभेत मातृशक्तीला स्थान मिळेपर्यंत लढत राहणार

**फडणवीसांचा इशारा**

■ मुंबई

**नारी**शक्ती वंदन विधेयक लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताअभावी नामंजूर झाल्यानंतर आज मुंबईत महिला आरक्षण विधेयकाच्या समर्थनार्थ महायुतीने जनाक्रोश मोर्चाचे आयोजन केले. वरळीच्या जांबोरी मैदानापासून सुरू झालेल्या मोर्चाची सांगता वरळी डोममध्ये जाहीर सभेद्वारे झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीचे प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी संसदेत व विधानसभेत मातृशक्तीला स्थान मिळेपर्यंत आम्ही लढत राहू, असा इशारा फडणवीस यांनी विरोधकांना दिला.

फडणवीस म्हणाले की, आजच्या मोर्चामुळे ज्यांनी नारीशक्ती विधेयकाला विरोध केला त्यांची झोप उडवल्याशिवाय राहणार नाही. जेव्हा हजारोंच्या संख्येने तुम्ही रस्त्यावरून चालत होता, तो विरोधकांसाठी इशारा होता.

आज हा मोर्चा संपला नाही तर लढाईला सुरुवात झाली आहे. जोपर्यंत देशाच्या संसदेत आणि राज्याच्या विधानसभेत आमच्या मातृशक्तीला स्थान मिळणार नाही तोपर्यंत आम्ही लढत राहणार. ते मिळवल्याशिवाय थांबणार नाही. झोपलेल्याला जागे करता येते, परंतु झोपेचे सोंग घेतलेल्याला जागे करता येत नाही. २०२३ मध्ये विधेयक पारित झाले. त्यातच नमूद होते की, जनगणना आणि डिलिमिटेशन करून विधेयक लागू करायचे. त्यावेळी सर्व दीड शहाण्यांनी समर्थन दिले होते. आता डिलिमिटेशन का असे विचारता? डिलिमिटेशन केले नाही तर संविधान संशोधन लागू होऊ शकत नाही आणि २०२९ च्या निवडणुकीत महिलांना आरक्षण मिळणार नाही. विरोधकांनी सांगावे की, तुम्हीच समर्थन दिलेल्या कायद्याला आता विरोध का?

# बॉम्बे पारसी पंचायत फोर्टमधील प्रसिध्द'डॅडी हाऊस' विकणार

■ मुंबई

**बॉम्बे** पारसी पंचायतने (बीपीपी) फोर्ट परिसरातील प्रसिध्द डॅडी हाऊस विकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी खुल्या निविदा मागवण्यात आल्या आहेत. या वास्तुची राखीव किंमत २ कोटी ५१ लाख रुपये ठेवण्यात आली आहे.इच्छुकांना १९ मेपर्यंत सीलबंद लिफाफ्यातून निविदा सादर कराव्या लागतील. निविदेसोबत १० लाख रुपये अनामत रक्कम भरावी लागणार आहे.

बीपीपीच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या निविदा सूचनेनुसार ही वास्तु जशी आहे,जिथे आहे, या तत्त्वावर विकण्यात येणार आहे. या व्यवहाराला धर्मादाय आयुक्तांची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

डॅडी हाऊस ही १२८.७६ चौरस मीटर क्षेत्रफळावर उभी असलेली इमारत आहे. इमारतीमध्ये १६ भाडेकरू आहेत. ही वास्तु सेस-ए या श्रेणीमध्ये मोडते. याचा अर्थ ही जुनी इमारत आहे.

# जव्हार नवीन सत्र न्यायालयाच्या मागणीला पुन्हा एकदा जोर!

**मुंबई उच्च न्यायालयात मागणी प्रस्ताव दाखल**

■ पालघर

२०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झाली आहे. परंतु १२ वर्षे उलटली तरी न्यायालयीन कामकाजासाठी नागरिक आणि वकील मंडळींना मुंबईकडेच पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे जव्हार, मोखाडा, विक्रमगड या तीन तालुक्यातील नागरिकांच्या जव्हार येथे नवीन सत्र न्यायालय सुरू करावे, या मागणीने आता पुन्हा जोर पकडला आहे.

जव्हार वकील संघटनेने त्यासाठी आता पुढाकार घेतला आहे. या मागणीचा प्रस्ताव उच्च न्यायालयात दाखल करण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्याचे मुख्यालय पालघर असले तरी दुर्गम भागातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी १०० ते १५० किलोमीटर करून मुंबईकडेच जावे लागत आहे. त्यामुळे वेळ,खर्चाचा नाहक बोजा नागरिकांवर पडत आहे. सध्या जव्हार येथे दिवाणी न्यायालय कार्यरत असले तरी सत्र न्यायालय नसल्याने एकाच न्यायाधीशावर प्रचंड कामाचा ताण येत आहे. परिणामी न्यायप्रक्रियेचा वेग मंदावल्याचे चित्र आहे. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सत्र न्यायालयासाठी आवश्यक असलेली इमारत, पायाभूत सुविधा, प्रशासकीय तयारी जव्हार येथे उपलब्ध आहे.


# इन्फ्ल्युएन्सर शेफाली वैद्य यांचे लेन्सकार्टच्या संचालकांना पत्र



■ मुंबई

**लेन्सकार्टमध्ये** हिंदू संस्कृतीतील महिलांच्या माथ्यावरील बिंदी, हातातील बांगड्या यांसारखी प्रतिके वापरण्यास मनाई केली जात असल्यावरून सध्या सोशल मीडियावर वादळ उठले आहे. लेन्सकार्टच्या या निर्णयाच्या अनुषंगाने इन्फ्ल्युएन्सर शेफाली वैद्य यांनी कंपनीच्या सर्व संचालकांना पत्र लिहिले असून, कंपनीच्या या वादग्रस्त निर्णय भूमिका काय आहे, हे स्पष्ट करण्याचे आवाहन केले आहे. लेन्सकार्टच्या या हिंदूविरोधी निर्णयाच्या विरोधात वादंग उठताच कंपनीचे सीईओ पीयूष बन्सल यांनी घाईघाईने जाहीर निवेदन केले. बिंदी-बांगड्यांसंबंधीचा आदेश हा चुकीचा आणि कालबाह्य झालेला आहे. १७ फेब्रुवारी रोजी हा आदेश रद्द करण्यात आला आहे, असा दावा बन्सल यांनी केला. मात्र बन्सल यांचा हा दावा खोटा असल्याचे शेफाली वैद्य यांनी पुराव्यानिशी दाखवून दिले आहे. अशाप्रकारे कोणत्याही व्यक्तीसोबत धर्माच्या आधारे भेदभाव करणे हे कायद्याचे उल्लघंन असल्याचे वैद्य यांनी पत्रात नमूद केले.

# लातूर पॅटर्नचे निर्माते व माजी खा. डॉ.गोपाळराव पाटील यांचे निधन



■ लातूर

**महाराष्ट्राच्या** शिक्षण क्षेत्राला 'लातूर पॅटर्न'ची ओळख करून देणारे, माजी खासदार आणि शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील (९४) यांचे आज सकाळी ७.१२ वाजताच्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर आज सायंकाळी ५ वाजता लातूरमधील संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल मैदान येथे अंत्यसंस्कार झाले.

गेल्या पंधरा दिवसांपासून ते आजारी होते. लातूरमधील गॅलेक्सी हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने लातूरसह संपूर्ण मराठवाड्यात शोककळा पसरली आहे. डॉ. पाटील यांनी शिक्षण, वैद्यकीय आणि समाजसेवा क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. 'लातूर पॅटर्न'च्या माध्यमातून त्यांनी राज्यातील शिक्षणपद्धतीला नवी दिशा दिली. ते शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. तसेच त्यांनी इंडियन पेडियाट्रिक असोसिएशनची शाखा स्थापन करून पहिले अध्यक्ष म्हणून काम पाहिले. १९९८ साली त्यांना 'सर्वोत्कृष्ट डॉक्टर संसदपटू' हा सन्मान मिळाला होता.

# पुण्यात आज पाणीपुरवठा बंद

■ पुणे

**संपूर्ण** पुणे शहराचा पाणीपुरवठा उद्या बंद राहणार आहे. शहरातील विविध जलकेंद्रांमध्ये विद्युत व स्थापत्य देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज मध्यरात्री १२ वाजल्यापासून ते उद्या रात्री १२ वाजेपर्यंत पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहील, तर शुक्रवारी २४ एप्रिल रोजी पाणीपुरवठा उशिरा सुरू होणार असून कमी दाबाने पाणी मिळणार असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.याशिवाय, जलसंपदा विभागाकडून १५% पाणी कपातीच्या सूचनेनंतर, पुण्यात पाणी व्यवस्थापनाबाबत नवे पर्याय विचाराधीन आहेत.

# भांडूप अपघाताला चालक जबाबदार बेस्टच्या अभियंता समितीचा निष्कर्ष

■ मुंबई

**भांडूप** रेल्वे स्थानकाजवळ ऐन गर्दीच्या वेळी बेस्टच्या बसला झालेल्या अपघाताला गाडीचा चालकच जबाबदार आहे, गाडीचा हँडब्रेक किंवा अन्य कोणत्याही सुट्या भागांत दोष नव्हता, असा निष्कर्ष बेस्ट अभियंत्यांच्या समितीने काढला आहे. समितीने काल आपला अहवाल बेस्टला सादर केला.

यासंदर्भात बेस्टच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, संबंधित बसच्या चालकाने गाडीच्या हँडब्रेकमध्ये दोष असल्याने अपघात झाला, असा दावा केला होता. त्यामुळे बेस्ट प्रशासनाने गाडीची तपासणी करण्यासाठी अभियंत्यांच्या समितीची स्थापना केली होती. या समितीने गाडीची संपूर्ण तपासणी करून गाडीचा हँडब्रेक उत्तम स्थितीत असल्याचा निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे आता संबंधित चालकावर कारवाईची प्रक्रिया सुरू झाली आहे. गेल्या रविवारी सकाळी भांडूप रेल्वे स्थानकाजवळ ऐन गर्दीच्या वेळी बेस्टची बस चालकाविना उतारावरून मागच्या बाजूने जात एका टेलिफोन बूथला धडकली होती.

# धबधबेवाडीचा सौर ऊर्जा प्रकल्प २ वर्षांपासून रखडला

**दोन वर्षांपूर्वी पन्हाळा तालुक्यातील धबधबेवाडी येथे ५४ लाख रुपयांचा सोलर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या प्रकल्पामुळे वीज खर्चात बचत होऊन ऐतिहासिक पन्हाळा गडावरील पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्प रखडल्याची माहिती समोर आली आहे.**

■ कोल्हापूर

**ऐतिहासिक** पन्हाळगड परिसरात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न वर्षानुवर्षे गंभीर बनला आहे. या गडावर पाणी पोहोचवण्यासाठी मोठी यंत्रणा उभारावी लागते. त्यासाठी होणारा वीज खर्चही पालिकेसाठी मोठे आव्हान ठरत असतो. त्यामुळेच धबधबेवाडी येथे सुमारे ५४ लाख रुपयांचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या प्रकल्पामुळे वीज खर्चात बचत होऊन पाणीपुरवठा सुरळीत होईल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्प रखडला असल्याचे समोर आले आहे. या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामालाही सुरुवात झाली होती, परंतु अवघे १० टक्के काम पूर्ण होण्यापूर्वीच संबंधित कंत्राटदाराने तब्बल ९० टक्के म्हणजे सुमारे ४०



लाख रुपये उचलल्याचा गंभीर आरोप पुढे आला होता. त्यामुळे पन्हाळगडावरील सामाजिक कार्यकर्ते प्रमोद उडाळे यांनी नगरपालिकेकडे वारंवार चौकशीची मागणी केली. मात्र, प्रशासनाकडून कोणताही ठोस प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी दोन महिन्यांपूर्वी माहिती अधिकारांतर्गत माहिती मागविली होती.

# कोस्टल रोड प्रकल्प महागला खर्चात आणखी ६० कोटींची वाढ

■ मुंबई

**मुंबईतील** वाहतूककोंडी फोडण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या कोस्टल रोड प्रकल्प खर्चात आणखी ६० कोटी रुपयांची वाढ झाली आहे. मरिन ड्राइव्ह येथील एन. एस. रोड येथील समांतर रस्त्याच्या कामासाठी खर्च वाढल्यामुळे कंत्राटदाराला सुमारे ६० कोटी रुपये द्यावे लागणार आहेत. स्थायी समितीच्या बैठकीत प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

या प्रकल्पाचा मूळ खर्च हा १२,७२१ कोटी ५९ लाख ५५ हजार रुपये होता. वस्तू व सेवा करांमुळे प्रकल्प खर्चात वाढ होऊन तो १३,०६० कोटी ९१ लाख ६२ हजार रुपये झाला. या प्रकल्पात पूल उभारणी करताना त्याच्या दोन खांबांमधील अंतराच्या आराखड्यात बदल केल्याने ही वाढ झाली. ही वाढ ९२२ कोटी रुपयांची होती.

# ठाणे आगारातून उन्हाळी सुट्टीसाठी ४९९ एसटी गाड्या

**ठाणे**- उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर, प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता ठाणे एसटी विभागाने १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत विशेष नियोजन केले आहे. या काळात ठाणे विभागातील विविध आगारांतून कोकण, मराठवाडा, खान्देश आणि पश्चिम महाराष्ट्राकडे नियमित व अतिरिक्त अशा एकूण ४९९ एसटी बसेस फेऱ्या सोड आहेत.

१५ एप्रिल ते १५ जून या कालावधीत उन्हाळी हंगामासाठी ठाणे विभागातून ५७ अतिरिक्त बसफेऱ्या आणि २८६ नियमित फेऱ्याही सुरू राहणार आहेत. या सर्व फेऱ्या मिळून एकूण ४९९ बसफेऱ्या कोकण, खान्देश, मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्रातील विविध शहरांकडे धावणार आहेत.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# उन्हाळ्यातील आगीचे प्रकार आणि अपघात


उन्हाळ्याचे दिवस म्हटल्यानंतर दोन प्रकारच्या दुर्घटनांमध्ये वाढ होते. एक म्हणजे आगी लागण्याचे प्रकार वाढतात. आणि दुसरं म्हणजे मोठ्या प्रमाणावर अपघातही याच काळात होतात. देशाच्या विविध भागांमध्ये गेल्या महिनाभरात तापमान प्रचंड वाढलेले आहे. आणि पुढच्या आठवडाभरात तापमानाचा उच्चांक गाठला जाईल असा अंदाज वेधशाळांनी व्यक्त केला आहे. तापमानाचे इतरही दुष्परिणाम याच काळात दिसतात. ज्यामध्ये ऊष्माघात तसेच अशुद्ध पाण्यातून निर्माण होणारे आजारही या काळामध्ये वाढीला लागतात. भारतात दरवर्षी साधारणपणे मार्च ते मे या तीन महिन्यांमध्ये या तीन प्रकारच्या संकटांचा प्रभाव वाढलेला असतो. दरवर्षी ऊष्माघातामुळे देशभरात जवळपास पाचशे ते सातशे बळी जातात. आगी लागण्याच्या प्रकारांमुळेसुद्धा या तीन महिन्यात सरासरी सव्वाशे ते दीडशे लोकांचे जीव जात असतात. या काळात पर्यटनाला जाणाऱ्यांची गर्दी जास्त असते. शाळांना असणाऱ्या सुट्ट्या आणि उन्हाळ्याच्या काहिलीपासून वाचण्यासाठी थंड हवेच्या पर्यटन स्थळांवर या काळात गर्दी होते. विशेषतः उत्तर भारतात हे तीन महिने पर्यटकांची तुडुंब गर्दी झालेली असते. त्यात प्रामुख्याने सिमला, कुलुमनाली, जम्मू-काश्मीर, तर देशाच्या पूर्व भागात दार्जिलिंग यासारख्या ठिकाणीदेखील लोक गर्दी करतात. अगदी आपल्या महाराष्ट्रातसुद्धा उन्हाळ्यामध्ये माथेरान, महाबळेश्वरला जाणाऱ्यांची नेहमीपेक्षा जास्त संख्या असते. पर्यटकांची वाढती संख्या आणि खासगी वाहनांची रस्त्यांवरची गर्दी याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा जास्त वाढते. आणि त्याला नियंत्रित करणे काहीवेळेला अशक्य होऊन जाते. अगदी गेल्या आठ दिवसातल्या दोन प्रमुख घटनांचा जरी विचार केला तरी हे तीन महिने म्हणजे सगळाच जीवघेणा प्रकार म्हणावा लागतो. उत्तरकाशीमध्ये फटाक्यांच्या कारखान्याला आग लागली आणि त्यात तब्बल २३ कामगारांचा मृत्यू झाला ज्यामध्ये तब्बल सोळा महिलांचा समावेश आहे. तर इकडे जम्मू-काश्मीरमध्ये उधमपूरजवळ प्रवासी बस दरीत कोसळल्याने २१ जणांना आपले प्राण गमवावे लागले. विशेष म्हणजे या बसमध्ये रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या जास्त होती.

**शॉर्टसर्किटचे प्रकार**

उन्हाळ्याचा कडाका हा तापमानामुळे वेगवेगळ्या पद्धतीने व्यक्त होत असतो. सर्व प्रकारची काळजी घेऊनही आगी लागू शकतात हे राजस्थानमधल्या पचपद्रा इथल्या रिफायनरीला लागलेल्या आगीतून स्पष्ट होते. या रिफायनरीचे उद्‌घाटन पंतप्रधानांच्या हस्ते होणार होते. परंतु त्याच्या आधी एक दिवस रिफायनरीला आग लागली आणि तिचे उद्‌घाटन पुढे ढकलावे लागले. आता या घटनेत हलगर्जीपणा झाला की, बेजबाबदारपणा झाला हे चौकशीनंतरच कळेल. परंतु दिवसेंदिवस वाढत चाललेला उन्हाचा चटका त्याचा एकूणच तापमानावर होणारा परिणाम आणि दुर्घटनांना मिळणारे आमंत्रण या गोष्टी एकमेकांशी किती निगडीत आहे हे स्पष्ट होते. प्रामुख्याने उन्हाळ्यात विजेची मागणी वाढते आणि पुरेशी वीज नसल्याने त्यातून होणारा शॉर्टसर्किटचा प्रकार छोट्या मोठ्या आगींची कारणं ठरतात. खरे तर गेल्या दहा वर्षांचा जर आढावा घेतला तर या तीन महिन्यांत शॉर्टसर्कीटमुळे आगी लागण्याच्या अक्षरशः शेकडो घटना घडतात. या प्रकारांवर नियंत्रण आणण्याची कोणतीही उपाययोजना केली जात नाही. वारंवार तेच तेच प्रकार घडतात. मग त्या त्या राज्यांची वीजमंडळं असतील. अग्निशमन दल यंत्रणा असेल. स्थानिक नगरपालिका, महापालिका असतील. यांच्यामार्फत हे शॉर्टसर्कीटचे प्रकार रोखण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याचे मार्गदर्शन केले जाऊ शकते. ज्याप्रमाणे विविध प्रकारचे आजार रोखण्याकरीता आरोग्य विभागांकडून सूचना दिल्या जात असतात. पावसाळ्यामध्ये अतिवृष्टीपासून बचाव करण्याकरीता खबरदारीचे उपाय सांगितले जात असतात. त्याचप्रमाणे उन्हाळ्यातल्या या आगींच्या घटना रोखण्याकरीता प्रसार माध्यमांमार्फत स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने आगी रोखण्याचे उपाय लोकांपर्यंत पोहोचवता येऊ शकतात. दुर्दैवाने एवढा साधासोपा उपायसुद्धा केला जात नाही. होरपळून मृत्युमुखी पडण्याचे प्रकार अत्यंत घातक आणि वेदनादायक असतात. मनुष्यांचे जीव वाचवायचे असतील तर सरकारी यंत्रणांमधली संवेदनशीलता वाढली पाहिजे. राज्यकर्ते अशा प्रकारचा संवेदनशीलपणा दाखवतीलच याची काही खात्री नाही. परंतु गडगंज पगार घेणारे सरकारी अधिकारी आणि नोकरदारांनी तरी आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडल्या पाहिजेत.

**वाहतूक पोलिसांची संख्या वाढवा**

याच काळातला रस्ते अपघातांचा प्रकारही अत्यंत धोकादायक ठरतो. आज वाहनांची संख्या अक्षरशः अफाट पद्धतीने वाढते आहे. पण या वाहनांवर वेगाचे आणि त्याच्या देखभालीबाबतचे नियंत्रण तितकेच गरजेचे ठरते. जुन्या गाड्या, मर्यादेपेक्षा अतिवेग, व्यसनं क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची ने-आण अशा एक ना अनेक कारणांनी अपघात होत राहतात. वाहनांच्या वाढत्या संख्येच्या प्रमाणात वाहतुकीचे नियंत्रण करणाऱ्या पोलिसांचीदेखील संख्या वाढली पाहिजे. शेकडो किलोमीटरचा प्रवास असतो. परंतु रस्त्यावर एकही वाहतूक पोलीस नियंत्रक किंवा मदत करणारी पोलीस व्यवस्था उपलब्ध नसते. अपघात झाल्यानंतर दोन-दोन, तीन-तीन तासांनी मदत मिळते. पण तोपर्यंत अनेकांचे प्राण गेलेले असतात. किमान दर दोनशे किलोमीटरवर वाहतूक नियंत्रण पोलिसांचे पथक किंवा फिरते पथक तैनात करण्याची आवश्यकता आहे. म्हणजे अपघातानंतर निदान पंधरा वीस मिनिटांत मदत उपलब्ध होऊ शकेल. याशिवाय वाहनांच्या वेगाच्या मर्यादाही पाळता येऊ शकतील. यासंदर्भात समृद्धी महामार्गाचे उदाहरण अतिशय बोलके आहे. सुरुवातीच्या काळात समृद्धी महामार्गावर सलग अपघात होत होते. परंतु तिथे ठिकठिकाणी वाहतूक नियंत्रक पोलिसांची गस्त सुरू झाल्यानंतर अपघातांचे प्रमाण घटले. वेगावरही नियंत्रण आले आणि योग्यवेळी मदतही उपलब्ध झाली. या अतिशय मूलभूत स्वरूपाच्या उपाययोजना आहेत. ज्याच्या अंमलबजावणीतून आधी अपघात रोखता येणे सहज शक्य आहे. म्हणजेच आगीच्या घटना असोत किंवा अपघात असोत. उपाययोजनांच्याच बाबतीत अत्यंत बेजबाबदारपणा होत असल्याने अनेकांचे जीव जात असतात.






## अभिषेक शर्माचा झंझावात!

# सनरायझर्स हैदराबाद संघाचा दिल्लीवर ४७ धावांनी विजय

**आयपीएल २०२६ च्या आजच्या ३१ व्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने आपल्या विस्फोटक फलंदाजीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्स समोर २४३ धावांचे प्रचंड आव्हान ठेवत सामना पूर्णपणे आपल्या ताब्यात घेतला. अभिषेक शर्माच्या झंझावाती नाबाद १३५ धावांनी दिल्लीला चितपट केले. राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर झालेल्या या लढतीत दिल्लीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र हैदराबादच्या फलंदाजांनी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत स्पर्धेतील चौथा विजय मिळवला. तर हैदराबादने दिल्ली कॅपिटल्सला १९५ धावांवर रोखले.**

हैदराबाद

**अभिषेक** शर्माने या सामन्यात अविस्मरणीय खेळी साकारत केवळ ६८ चेंडूंमध्ये नाबाद १३५ धावा केल्या. त्यांच्या खेळीत १० चौकार आणि १० षटकारांचा समावेश होता. ट्रॅव्हिस हेड आणि इशान किशन यांच्या आक्रमक सुरुवातीमुळे हैदराबादचा डाव आणखी मजबूत झाला आणि मधल्या तसेच अखेरच्या षटकांतही धावांचा वेग कायम राहिला.

हैदराबादने २० षटकांत २ गडी गमावत २४२ धावा उभारल्या. यामध्ये त्यांनी १० चौकार आणि १० षटकारांची खेळी केली.हेनरिक क्लासेन यांनी अखेरच्या षटकांत आक्रमक फलंदाजी करत अभिषेकला उत्तम साथ दिली आणि संघाला विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले. त्यांच्या नाबाद भागीदारीमुळे दिल्लीच्या गोलंदाजांवर प्रचंड दडपण निर्माण झाले. दिल्ली कॅपिटल्सच्या डावाची सुरुवात मात्र निराशाजनक ठरली. सुरुवातीलाच गडी बाद झाल्याने संघावर दडपण वाढले आणि त्यानंतरही सातत्याने विकेट पडत राहिल्या. काही फलंदाजांनी झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण हैदराबादच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत दिल्लीचा डाव विस्कळीत केला.

२४३ धावांचा पाठलाग करताना पाथुम निसांका (८) दिलशान मदुशंकाच्या गोलंदाजीवर लवकर बाद झाला.के. एल. राहुलने काही काळ किल्ला लढवण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर नितीश राणा बाद झाल्याने संघावर दडपण वाढले. १६ व्या षटकात समीर रिझवी आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी पाचव्या विकेटसाठी अर्धशतकीय भागीदारी पूर्ण केली.

स्टब्सने इशान मलिंगाच्या दुसऱ्याच चेंडूवर चौकार मारून ही भागीदारी ५० धावांच्या पुढे नेली. मात्र पाचव्या चेंडूवर साकिब हुसेनच्या गोलंदाजीवर ट्रिस्टन स्टब्स झेलबाद झाला आणि ही भागीदारी तुटली. आशुतोष वर्मा १४ धावांवर बाद झाला. त्यानंतर ७ वी विकेट घेऊन या सामन्यात हैदराबादने सर्व आघाड्यांवर वर्चस्व गाजवत दिल्ली कॅपिटल्सवर मोठा विजय मिळवला.

# मुंबई बंदर-ठाणे पालिका उपांत्य फेरीत

**मुंबई** - आमदार सुनील राऊत यांच्या पुढाकाराने सुरू असलेल्या आमदार चषक कबड्डी स्पर्धेत तिसऱ्या दिवशी प्रेक्षकांना थरारक सामन्यांची मेजवानी मिळाली. चढाया, पकडी, झुंजार बचाव व अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या संघर्षानंतर पुरुषांच्या व्यावसायिक गटात मुंबई बंदर व ठाणे महानगरपालिका यांनी उपांत्य फेरीत धडक मारली. विक्रोळी पूर्व येथील टागोर नगरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. मुंबई बंदरने संत सोपान काका बँकवर ३६-३२ असा थरारक विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. ठाणे पालिकेने मीरा-भाईंदर पालिकेवर २८-२५ अशी मात केली. अन्य सामन्यांत भारत पेट्रोलियमने केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागावर ३५-३० असा विजय मिळवला तर आयएसपीएलने मुंबई पोस्टलचा ४६-३४ असा पराभव केला.

## मुंबईच्या शरीरसौष्ठवपटूंना शासनाने बळ द्यावे

मुंबई

**राष्ट्रीय** शरीरसौष्ठव स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या मुंबईतील खेळाडूंच्या सन्मान सोहळ्यात मुंबई शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष अजय खानविलकर यांनी राज्य शासनाला आवाहन केले. त्यांनी शरीरसौष्ठवपटूंना समाजातून आणि क्रीडाप्रेमींकडून मिळणारे प्रोत्साहन महत्त्वाचे असले तरी शासनाकडूनही त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडली पाहिजे, असे सांगितले.

**जाहीर सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कीस्टोन रिअल्टर्स लिमिटेड, कंपनी कायदा १९५६ च्या तरतुदींअंतर्गत स्थापित कंपनी, नोंदणीकृत कार्यालय - ७०२, नटराज, एम. व्ही. रोड जंक्शन, पश्चिम द्रुतगती महामार्ग, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९, यापश्चात 'प्रवर्तक' असे उल्लेखित, यांच्या याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या त्यांच्या मालकीच्या जागेच्या संदर्भात शीर्षकाची तपासणी करण्याच्या सूचना माझ्या अशिलांनी मला दिल्या आहेत. स्वतंत्र व्यक्ती, हिंदू अविभक्त कुटुंबे, कंपन्या, बँका, हौसिंग आणि इतर वित्तपुरवठा कंपन्या, संस्था, असोसिएशन्स, किंवा अन्य कोणतीही प्राधिकरणे, इ. समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्ती/संस्थांचा याखाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जागांवर कोणतेही सामंजस्य करार, विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, मालकी, गहाणवट, धारणाधिकार, प्रभार, ताबा, हक्कसोड, जप्ती, खटला, लवाद या मार्गे किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्य कोणत्याही पद्धतीने कोणतेही आक्षेप किंवा दावे असल्यास, त्यांनी त्याबाबत मला कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात माझ्या निम्नउल्लेखित कार्यालयात सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे. असे न केल्यास, असे समजण्यात येईल की, त्यावर कोणतेही दावे/आक्षेप नाहीत आणि माझे अशील अशा दावे/आक्षेपांच्या संदर्भाशिवाय सदर अनुसूचित जागा सदर प्रवर्तकाकडून खरेदी व्यवहार पूर्ण करतील.

**वरील उल्लेखित जागेची अनुसूची:**

गाव चेंबूर, ता. कुर्ला, आर. सी. मार्ग, बसंत पार्क पोलीस स्टेशन समोर, चेंबूर, मुंबई ४०००७१चा सीटीएस क्र. १७१८, १७१८/१ ते ८१ धारण केलेल्या भूखंडावरील "रुस्तमजी बालमोराल - विंग एफ" या स्थावर मालमत्ता प्रकल्पाच्या विंग एफ/एस३ मधील सदनिका क्र. ८०२, मोजमाप १४२.३० चौ.मी. कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य १५३१.७१ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह विंग एफच्या तळघर स्तरावरील २ जोडी कार पार्किंग क्र. १८१ ए आणि १८१ बी चे सर्व खंड आणि तुकडे.

**अभिषेक के. पारेख**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय**
दुकान क्र. १५ आणि १६, जनता मार्केट,
चेंबूर रेल्वे स्टेशनजवळ,
चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.

**जाहीर सूचना**

येथे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही सौ. चंदा सुभाष रुणवाल या, खालील अनुसूचीत अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे **सदर मालमत्ता** म्हणून उल्लेख) मालक म्हणून त्यांच्या शिर्षकाची चौकशी करीत आहोत - सदर मालमत्ता म्हणजे युनिट क्र. शॉप-जी ८ आणि मेझनाईन क्र.८ए, तळमजला आणि मेझनाइन फ्लोअरवरील, अनुक्रमे सुमारे ७४४.८१ चौ. फूट दुकान व २९२८.६६ चौ. फूट मेझनाईन कार्पेट क्षेत्रफळ असलेली जागा, टॉवर क्र. १ (जेमिनी) मधील, **'रुणवाल ॲथुरियम'** या नावाने ज्ञात प्रकल्पातील इमारतीत स्थित, जे सर्व्हे क्र. ३०४ आणि ३०५ तसेच सीटीएस क्र.८८४ए, ८८४बी व ८८४सी असलेल्या जमिनीवर, एल.बी.एस. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई–४०००८० येथे स्थित असून, तिचे सविस्तर वर्णन खालील अनुसूचीत दिलेले आहे, सदर मालमत्ता कोणत्याही प्रकारच्या बोजा, दावे, हक्क किंवा अडचणींपासून मुक्त आहे.

याद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना आवाहन करण्यात येते की, ज्यांना सदर मालमत्तेबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत मालकी, ताबा, वारसा, विक्री, गहाण, वहिवाट, विकास हक्क, हस्तांतरण, भाडेपट्टा, धारणाधिकार, अदलाबदल, परवाना, ट्रस्ट, सुखसोयी, जप्ती, नियुक्ती, देखभाल, प्रलंबित खटले, प्रभार, भेट किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, हितसंबंध, दावा किंवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी त्यासंबंधित वैध व प्रमाणित कागदपत्रांसह आपला दावा लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यांकडे, खाली नमूद पत्त्यावर, या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून **७ (सात)** दिवसांच्या (दोन्ही दिवस समाविष्ट) आत कळवावे, अन्यथा, अशा व्यक्तींचे कोणतेही दावे असल्यास ते माफ केलेले आणि/किंवा त्याग केलेले समजले जातील.

**वर संदर्भित अनुसूची**

युनिट क्र.दुकान-जी ८ आणि मेझनाईन – ८ए, तळमजला आणि मेझनाईन फ्लोअरवरील, अनुक्रमे सुमारे ७४४.८१ चौ. फूट दुकान आणि २९२८.६६ चौ. फूट मेझनाईन कार्पेट क्षेत्रफळ असलेली जागा, टॉवर क्र.१ (जेमिनी) मधील, **'रुणवाल ॲथुरियम'** या नावाने ज्ञात प्रकल्पातील इमारतीत स्थित, जे सर्व्हे क्र. ३०४ व ३०५ तसेच सीटीएस क्र.८८४ए, ८८४बी व ८८४सी असलेल्या जमिनीवर, एल.बी.एस. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई – ४०००८० येथील सर्व भाग व खंड.

**आज दिनांकित २२ एप्रिल, २०२६ रोजी**

सही/-
भागीदार
**इंडिया लॉ अलायन्स**
१ला मजला, जीवन प्रकाश इमारत,
सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१
mail@indialawalliance.com

**जाहीर सूचना**

**सौ.अवनी अमर देसाई (फ्लॅट क्र.बी-२०२) व श्री.सितल उमाकांत देसाई (फ्लॅट क्र.बी-२०१), राजकमल कोहौसो, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई – ४०००५४** यांनी त्यांच्या नावावर भाग प्रमाणपत्र हस्तांतरणासाठी अर्ज केला आहे; सदर फ्लॅट्स पूर्वी दिवंगत **श्री.अमर उमाकांत देसाई (निधन दिनांक ०९.०४.२०२१)** यांच्यासह संयुक्तरित्या धारित होते व मालकी हक्क विभाजन/रिलीज डीडद्वारे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. सदर बाबत कोणास काही दावा/आक्षेप असल्यास त्यांनी पुराव्यासह लेखी स्वरूपात या सूचनेच्या प्रसिद्धीपासून **१५ दिवसांच्या** आत कळवावे, अन्यथा कोणतेही दावे ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**राजकमल कोहौसोलि**
फिरोजशाह मेहता रोड, जैन मंदिराजवळ,
सांताक्रूझ पश्चिम, मुंबई - ४०००५४
ठिकाण: मुंबई दिनांक: २२.०४.२०२६

**जाहीर सूचना**

माझे अशिल नवीनचंद्र गोविंदराव अंबुलकर, नमिता नवीनचंद्र अंबुलकर, प्रवीण चापसी गडा व अन्य यांच्यासोबत दुकान क्र.८ व ९, एकूण सुमारे ४१८ चौ. फूट क्षेत्रफळ असलेल्या, सर्व्हे क्र. २२ (आता सीटीएस क्र. ३६८, ३६८/१ ते ३६८/२६), लाडिवाला चाळ, सर एम. व्ही. रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व), मुंबई – ६९ येथील (दुकाने) भाडेहक्क मिळविण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत. राधिका निवास कोहौसोलि. ही संपूर्ण मालमत्तेची मालक असून, त्यातील काही भागाबाबत आकार डेव्हलपर्स हे भाडेपट्टेदार आहेत, ज्यांनी संयुक्तपणे संपूर्ण मालमत्तेबाबत, ज्यामध्ये सदर दुकानेही समाविष्ट आहेत, जेट स्पीड रिआल्टर्स प्रा. लि. यांच्या नावे विकास हक्क प्रदान केले आहेत.

कोणा व्यक्तिस सदर नमूद दुकानांबाबत विक्री, अदलाबदल, वारसा, करार, कंत्राट, न्यायप्रक्रिया, गहाण, सुखसोयी, भेट, भाडेपट्टा, वहिवाट, लिव्ह अँड लायसन्स, धारणाधिकार, प्रभार, ट्रस्ट किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही आक्षेप किंवा दावा असल्यास त्यांनी त्यांच्या दाव्याचे पुरावे दर्शविणारी कागदपत्रे जोडून, लेखी स्वरूपात खाली सही करणाऱ्यांकडे या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे, अन्यथा, आमचे अशिल सदर बाबत व्यवहार पूर्ण करतील.

**दिनांक:** २२.०४.२०२६ सही/-

**पियुष शाह ॲण्ड असोसिएट्स,**
**ॲडव्होकेट्स अँड सॉलिसिटर,**
**महेंद्र के. शाह,**
**पियुष महेंद्र शाह,**
**ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर, इंग्लंड ॲण्ड वेल्स**
४०६, हमाम हाऊस, हमाम स्ट्रीट,
अंबालाल दोशी मार्ग, फोर्ट, मुंबई- ४००००१

**महावितरण** — **ई–निविदा**

म. रा.वि.वि.कं.मर्या. जयसिंगपूर विभागीय कार्यालय अंतर्गत पाच उपविभागातील लघुदाब वाहिनी (LT) व उच्चदाब वाहिनी (HT) यामधील देखभाल दुरुस्ती (प्रिव्हेन्टीव्ह मेनटेनन्स) कामासाठी रु.१० लक्ष प्रत्येकी याप्रमाणे ई-निविदा क्र. टी-०४ ते टी-१३/२०२६-२७ महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे. सदर निविदा विक्रीसाठी २२.०४.२०२६ पासून २८.०४.२०२६ पर्यंत उपलब्ध राहील. सदर निविदा संकेतस्थळावर २८.०४.२०२६ वेळ १८: ०० पर्यंत उपलब्ध राहील. वरील प्रत्येक निविदेस ई.एम.डी. १००००/- व प्रत्येकी टेंडर फ़ी ११८०/- आहे.

कार्यालयीन संपर्क क्र- ७८७५७६९३५५

पी.आर.ओ.- २४ /२०२६-२७ **कार्यकारी अभियंता, जयसिंगपूर**

**महावितरण** — **ई–निविदा सूचना**

महावितरण तर्फे, अधीक्षक अभियंता कल्याण मंडळ १, कल्याण अंतर्गत **Preventive Maintenance of Substations in Kalyan Circle- I, Kalyan Zone** ची कामे करण्यासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून निविदा क्रमांक **SE/KC-I/T/PMSS/2026-27/T-01** साठी ऑनलाईन निविदा मागवण्यात येत आहे. सदर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर दिनांक **२२/०४/२०२६ ते ०६/०५/२०२६** दुपारी १३:०० पर्यंत उपलब्ध आहेत, तसेच दुपारी १५:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दिनांक **०६/०५/२०२६** रोजी दुपारी १६:०० नंतर शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदा संदर्भात अधिक माहितीसाठी कार्यकारी अभियंता प्रशासन कल्याण मंडळ १ भ्रमणध्वनी क्रमांक ८८७९६२६१३१ वर संपर्क साधावा. निम्न स्वाक्षरी यांनी कुठलीही कारणा न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धिपत्रकाबाबत फक्त संकेतस्थळावरील Announcements मध्येच कळवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सही**
**अधीक्षक अभियंता, कल्याण मंडळ १, कल्याण**

**जाहीर सूचना**

तमाम जनतेस याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही याखाली लिहिलेल्या पहिला, दुसरा आणि तिसरा असे वर्णन केलेल्या अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागेच्या संदर्भात **अशोक पटनी हिंदू अविभक्त कुटुंब द्वारे त्यांचे कर्ता अशोक पटनी,** आणि **(१) अशोक पटनी आणि (२) आरती पटनी ("मालक")** यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहोत.

सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागा किंवा तिच्या कोणत्याही भाग/तुकड्याच्या विरुद्ध, मध्ये किंवा वर विक्री, हस्तांतरण, देवाणघेवाण, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेपट्टीकरिता करारपत्र, अभिहस्तांकन, बोजा, गहाणवट, प्रभार, धारणाधिकार, भागिदारी, वारसा, मृत्युपत्र, उत्तराधिकार, भेट, देखभाल, वहिवाट, न्यास, भाडेकरू, पोट-भाडेकरू, लिव्ह ॲण्ड लायसन्स, काळजीवाहू आधारे, भोगवटा, ताबा, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कंत्राट/करारपत्रे, बार्टर व्यवस्था, हमी, करार, न्यास, वक्फ, मार्गाचा हक्क, आरक्षण, प्रलंबित कायदेशीर कारवाई, लाभार्थी हितसंबंध, त्याग, विभागणी, मुखत्यार पत्र, तारण, कर्जे, अग्रीम, आदेश किंवा हुकूम किंवा निर्देश किंवा कायद्याच्या कोणत्याही न्यायालय किंवा कोणत्याही इतर वैधानिक किंवा निर्णय घेणारे प्राधिकारी किंवा लवादाचा आदेश, शीर्षक कागदपत्रांच्या ठेवींचे ज्ञापन, प्रतिभूती या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, लिखित किंवा मौखिक, हिस्सा, हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी असणाऱ्या सर्व आणि कोणत्याही व्यक्ती(र्ती)नी त्याबाबत लेखी स्वरुपात, सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना २०४-बी, २ रा मजला, "हॉलमार्क बिजनेस प्लाझा", गुरुनानक रुग्णालयाजवळ, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे यामधील दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करावे, असे न केल्यास सदर सदनिका आणि सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागेमधील/च्या नात्याने असा कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी सोडून दिला आणि/किंवा त्याग केला आणि असा कोणताही हक्क, शीर्षक, लाभ, हितसंबंध, दावा आणि/किंवा मागणी अस्तित्वात नाही असे समजण्यात येईल आणि असे कोणतेही दावे आणि/किंवा आक्षेप, जर असल्यास, सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

**वरील उल्लेखित अनुसूची**
(सदर सदनिका, सदर समभाग आणि सदर कार पार्किंग जागेचे वर्णन)

*पहिला:*
खेरनगर, एमएचबी कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सर्वोदया को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या "सर्वोदया" या इमारतीमधील "बी" विंगच्या ३ ऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०१, मोजमाप अदमासे ७५४ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य ७०.४५ चौरस मीटर्स व सुविधा तसेच त्यासह सदर सदनिकेस संलग्न असलेल्या फ्लॉवर बेड/ड्राय बाल्कनीच्या स्वरुपातील मोफत १२८ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ, व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ६ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१८ अन्वये संस्थेद्वारे पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. ५१ ते ६० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग व त्यासह सदर इमारतीमधील कार पार्किंग जागा.

*दुसरा:*
खेरनगर, एमएचबी कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सर्वोदया को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या "सर्वोदया" या इमारतीमधील "बी" विंगच्या ३ ऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०२, मोजमाप अदमासे ७८० चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य ७२.४६ चौरस मीटर्स व सुविधा तसेच त्यासह सदर सदनिकेस संलग्न असलेल्या फ्लॉवर बेड/ड्राय बाल्कनीच्या स्वरुपातील मोफत १२६ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ, व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ७ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१८ अन्वये संस्थेद्वारे पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. ६१ ते ७० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग व त्यासह सदर इमारतीमधील कार पार्किंग जागा.

*तिसरा:*
खेरनगर, एमएचबी कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ येथे स्थित, वसलेल्या आणि असलेल्या सर्वोदया को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या "सर्वोदया" या इमारतीमधील "बी" विंगच्या ३ ऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०३, मोजमाप अदमासे ६२४ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ समतूल्य ५७.३७ चौरस मीटर्स व सुविधा तसेच त्यासह सदर सदनिकेस संलग्न असलेल्या फ्लॉवर बेड/ड्राय बाल्कनीच्या स्वरुपातील मोफत १०५ चौरस फूट कार्पेट क्षेत्रफळ, व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ८ दिनांक ४ नोव्हेंबर, २०१८ अन्वये संस्थेद्वारे पारित डिस्टिंक्टिव्ह क्र. ७१ ते ८० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- (रुपये पन्नास मात्र) प्रत्येकीचे १० पूर्णतः भरणा केलेले समभाग व त्यासह सदर इमारतीमधील कार पार्किंग जागा.

दिनांक २२ एप्रिल, २०२६

मे. लॉ ओरिजिन
सही/-
नमिता चेतन नाटेकर
भागिदार


**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आयुष्याचं सर्वात सुंदर रोप म्हणजे विश्वास.
जे जमिनीत नाही, तर हृदयात फुलतं.

**पंचांग**

**बुधवार, २२ एप्रिल २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**



*** वैशाख शुक्ल षष्ठी**
*** नक्षत्र - आर्द्रा**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मिथुन**

**रवी उदय- ०६-१८**
**रवी अस्त- १८-५७**

**श्रीरामानुजाचार्य जयंती, श्री नृसिंह नवरात्रारंभ, जागतिक वसुंधरा दिन**

# पाककृती



## ओल्या बोंबलाचे तिरवट

★ **साहित्य :** ओले बोंबील- २५० ग्रॅम (स्वच्छ धुवून, तुकडे करून व पाणी निथळून घेतलेले), कांदा- २ मध्यम बारीक चिरलेला, टोमॅटो- १ मध्यम बारीक चिरलेला, आलं-लसूण पेस्ट- १ चमचा, लाल तिखट- २-३ चमचे आवडीनुसार, हळद- १/२ चमचा, गरम मसाला/मालवणी मसाला- १ चमचा, कोकम/चिंच- ४-५ पाकळ्या (आंबटपणासाठी), तेल- ३-४ मोठे चमचे, कोथिंबीर- बारीक चिरलेली, मीठ- चवीनुसार.



★ **कृती:** ओले बोंबील स्वच्छ धुवून घ्या, त्यांना थोडे मीठ लावून १० मिनिटे ठेवा आणि नंतर हाताने दाबून त्यातील जास्तीचे पाणी काढून टाका.

कढईत तेल गरम करून त्यात बारीक चिरलेला कांदा सोनेरी होईपर्यंत परता. आलं-लसूण पेस्ट व टोमॅटो टाकून मऊ होईपर्यंत शिजवा. त्यानंतर हळद, लाल तिखट आणि गरम मसाला टाकून तेल सुटेपर्यंत परता. आता तयार मसाल्यात ओले बोंबील टाका आणि हलक्या हाताने मिक्स करा (बोंबील लवकर तुटतात).

चवीपुरते मीठ (बोंबलाला आधी लावले असल्यास जपून टाका), कोकम आणि थोडी कोथिंबीर टाकून झाकण ठेवून ५-७ मिनिटे वाफेवर शिजवा.

तयार झणझणीत ओल्या बोंबलाचे तिखट भाकरी किंवा गरम भातासोबत सर्व्ह करा.

ओले बोंबील खूप नाजूक असतात, त्यामुळे ते जास्त हलवू नयेत.

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

# राज्यात अवकाळी पावसाचा जोर उकाड्यातून दिलासा! शेतीला फटका

■ मुंबई

**मुंबईसह** राज्यातील अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना त्यामुळे काहीसा दिलासा मिळाला. मात्र अनेक ठिकाणी शेतीला फटका बसला आहे.

नवी मुंबईत आज पहाटे मुसळधार पाऊस पडला. बदलापूर येथे सकाळच्या सुमारास अचानक ढगांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. गेल्या दोन दिवसांपासून ४० अंशांच्या पुढे गेलेल्या तापमानानंतर या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. मात्र, कामावर जाणाऱ्या नोकरदार वर्गाला भिजतच रेल्वे स्थानक गाठावे लागले. कर्जत परिसरातही सकाळपासून ढगाळ वातावरण होते. त्यानंतर मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. रस्त्यावर भाजीपाला आणि फळ विक्रेत्यांची धांदल उडाली. थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरान येथेही अवकाळी पावसाची जोरदार सुरुवात झाली. घोडेवाले, रिक्षावाले तसेच बाजारपेठेतील टपरीवाल्यांची तारांबळ उडाली, तर पर्यटकांनी आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेतला. कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ आणि सावंतवाडी तालुक्यांत मेघगर्जनेसह पाऊस कोसळला. हवामान विभागाने २४ एप्रिलपर्यंत 'यलो अलर्ट' जारी केला आहे. आंबा आणि काजू पिकांना फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. मराठवाडा आणि विदर्भातही अवकाळी पावसाचा परिणाम जाणवला. परभणी, नांदेड तसेच इतर जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी वादळी वाऱ्यामुळे झाडे कोसळून वीजपुरवठा खंडित झाला. या पावसाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. नांदेडमध्ये केसर आंब्याचे नुकसान झाले, तर हिंगोलीत हळद उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे कच्च्या आंब्यांचा सडा पडल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले. यवतमाळमध्ये पावसामुळे तीळ पिकाचे नुकसान झाले.

# १८१ दिवसांनंतर केदारनाथचे दरवाजे आज उघडणार

■ डेहराडून

**चारधाम** यात्रेच्या तिसऱ्या दिवशी आज बाबा केदार यांची पंचमुखी डोली केदारनाथ धाममध्ये पोहोचली आहे. ओंकारेश्वर मंदिरातून निघालेल्या या डोलीने तीन दिवसांत ५७ किलोमीटरची पायी यात्रा पूर्ण केली आहे. डोली केदारनाथमध्ये पोहोचताच आता धाममध्ये कपाट उघडण्याची तयारी सुरू झाली आहे. उद्या सकाळी ८ वाजता भाविकांसाठी मंदिराचे दार १८१ दिवसांनंतर उघडले जातील. बाबांच्या स्वागतासाठी आज येथे सुमारे ६ ते ८ हजार भाविक पोहोचले होते.

दुसरीकडे, बद्रीनाथ मंदिराचे दार उघडण्याची प्रक्रियाही सुरू झाली आहे. नृसिंह मंदिरातून आदि गुरु शंकराचार्य यांची गादी आणि गरुडजींची डोली बद्रीनाथसाठी रवाना झाली आहे. सर्व देव डोल्यांचे मिलन पांडुकेश्वर येथे होईल, जिथे रात्रीच्या विश्रांतीनंतर या डोल्या पुढे सरकतील आणि परवा सकाळी बद्रीनाथ धामचे कपाट भाविकांसाठी उघडले जातील. बद्रीनाथ धामचे दरवाजे परवा भाविकांसाठी उघडले जाणार आहेत. हे लक्षात घेऊन चमोली पोलिसांनी सुरक्षेची व्यापक व्यवस्था केली आहे. धाममध्ये दहशतवादविरोधी पथकदेखील तैनात करण्यात आले आहे. भगवान बद्री विशाल यांची आज जोशीमठ येथून धामसाठी रवाना झाली. सुमारे ४२ किलोमीटरचा प्रवास करून डोली उद्या संध्याकाळी बद्रीनाथ धाममध्ये पोहोचेल. परवा सकाळी ६.१५ वाजता मंदिराचे दरवाजे भाविकांसाठी उघडले जातील.

# नेपाळमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना दर १५ दिवसांनी वेतन मिळणार

**काठमांडू** - नेपाळमधील सरकारी कर्मचाऱ्यांना आता दर १५ दिवसांनी पगार मिळणार आहे. महिन्याला एकदाच वेतन देण्याची दीर्घकालीन पद्धत बदलण्यात आली आहे. १७ एप्रिल रोजी अर्थ खात्याच्या निर्णयानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना महिन्यातून दोनदा वेतन दिले जाणार आहे. नेपाळ सरकारने खर्च वाढवण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आपल्या कर्मचाऱ्यांना पंधरवड्याने वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे.

# वसई अप्पर तहसिलदारांच्या वतीने लाच घेणारा अटक

**वसई** - जागेला अकृषिक मान्यता देण्यासाठी व अनधिकृत बांधकामावर कारवाई न करण्यासाठी वसईच्या अपर तहसिलदारांनी तब्बल ४० लाख रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ठाण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून अपर तहसिलदारांच्या खासगी इसमाला ७ लाखांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली. या प्रकरणी अपर तहसीलदार विनोद धोत्रे फरार झाला असून, त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांची वसई पूर्वेच्या मधुबन परीसरात दोन एकर जागा आहे. यातील काही जागेवर त्यांनी अनधिकृत बांधकाम केले होते. वसई तहसीलदार कार्यालयात वावरणारा खासगी इसम अनिल चौबळ याने अपर तहसीलदार विनोद धोत्रे यांच्या वतीने तक्रारदारास संपर्क केला. या अनधिकृत बांधकामावर कारवाई होऊ नये यासाठी १० लाख तसेच संबंधित जागा अकृषीक करण्यासाठी ४० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (वाहतूक) - पश्चिम उपनगरे

**ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| निविदा दस्तऐवज क्र. | २०२६_एमसीजीएम_१२९६७९३_१ |
| संस्थेचे नाव | बृहन्मुंबई महानगरपालिका |
| विषय | पी/एस प्रभागाला भाडेतत्त्वावर जेसीबी सेवा पुरवणे. |
| निविदेचे मूल्य | रू.३९९३/- + (१८% जीएसटी) |
| बोली सुरक्षा अनामत/इरठे | रू.२४,९००/- |
| ई-निविदेची विक्री आणि पारित दिनांक | दि.२१.०४.२०२६ रोजी १३.०० वा. |
| निविदा विक्रीचा अंतिम दिनांक व वेळ आणि बोली सुरक्षा ठेवीची पावती | दि.२८.०४.२०२६ रोजी १६.०० वा. |
| पाकिट अ, ब आणि पाकिट क (ऑनलाईन) चे सादरीकरण | दि.२८.०४.२०२६ रोजी १६.०० वा. |
| पाकीट अ व ब उघडणे | दि.२९.०४.२०२६ रोजी १६.०५ वा.नंतर |
| पाकीट क उघडणे | नंतर कळविले जाईल |
| संपर्काचा पत्ता | कार्यकारी अभियंता (वाहतूक) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय, मिलन मॉल समोर, मिलन सबवे रोड, एस.व्ही. रोड जवळ, सांताक्रूझ (पश्चिम) मुंबई - ४०० ०५४. दूर.: ०२२-२६१८२२५२/५३/५४ ई-मेल: trsg2008@yahoo.com |
| बोली उघडण्याचे ठिकाण | कार्यकारी अभियंता (वाहतूक) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय |

सदर निविदा दस्तऐवज हस्तांतरणीय नाही.

प्रस्तुत ई-निविदेसंदर्भात कोणतीही पुरवणी आणि/किंवा शुद्धीपत्रक निर्गमित झाल्यास, त्याबाबतचा तपशील महाराष्ट्र शासनाच्या ई-खरेदी प्रणालीवर (Mahatenders)(https://mahatenders.gov.in). under Tenders > e-Tenders > Tenders या विभागांतर्गत प्रकाशित/अपलोड केला जाईल. संभाव्य बोलीदारांनी याची नोंद घ्यावी, अशी विनंती आहे.

कोणतेही कारण न दर्शविता वरील विषयाकरिता प्राप्त झालेला कोणताही अर्ज स्वीकारण्याचे किंवा कोणताही किंवा सव अर्ज फेटाळण्याचे अधिकार बृमुंमपाने राखून ठेवले आहेत.

सही/-

पीआरओ/१४६/जाही/२०२६-२७ कार्यकारी अभियंता (वाहतूक) प.उ.

खिडक्यांसाठी जाळ्यांचा आणि मच्छरदाण्यांचा वापर करा

मुख्य कार्यालय, विरार
यशवंत नगर, विरार (प.)
ता. वसई, जि. पालघर - ४०१३०३

दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जा.क्र.: व.वि.श.म./बांध/श.अ/२४/२०२६
दि. : २१/०४/२०२६

## जाहिर ई-निविदा सुचनेस मुदतवाढ

वसई विरार शहर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभागामार्फत जाहिर ई-निविदा सुचना दि. १५/०४/२०२६ रोजी (https://mahatenders.gov.in) या अधिकृत संकेतस्थळावर जा.क्र.व.वि.श.म./ बांध/ शअ/ १२/२०२६-२७ दि. १३/०४/२०२६ अन्वये प्रसिद्ध करून दि. १५/०४/२०२६ ते दि.२२/०४/२०२६ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन मागविण्यात आल्या होत्या. सदर कामाकरीता खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

मुदतवाढीचा तपशील खालीलप्रमाणे.

१. ऑनलाईन ई-निविदा स्विकृतीची अंतिम दिनांकः- दि. २७/०४/२०२६ दु.३.०० वाजेपर्यंत
२. ऑनलाईन ई-निविदा उघडण्याची दिनांकः- दि. २८/०४/२०२६ दु.३.०० वा.

सही/-
(प्रदीप पाचंगे)
प्र. शहर अभियंता
वसई विरार शहर महानगरपालिका

जावक क्र. व.वि.श.म./मा.व.ज./१५८/२०२६

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-Tender Notice

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000039599 | EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-05/26-27 | SRM Tender for providing & fixing of PSU/Remote Indicator Suitable for WTI/OTI of ICT's and PTRs at 400kV Kharghar S/stn under 400kV RS O&M Dn., Kharghar. | Rs. 10.10 Lakhs (incl. GST) | Rs. 10108.39 | Rs. 590/- (incl. GST) |

**Sale period:** 20.04.2026 to 04.05.2026, **Last Date of Submission:** 04.05.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 05.05.2026 at 10:30 Hrs (if possible).

**Contact person:** Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar. (Contact No-9167006557). For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV RS O&M Dn., Kharghar**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-Tender Notice

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Description / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | CHP-A/ Rfx No.3000067668(Refloated)/Annual contract for providing 9 nos. drivers on hire basis to drive departmental road vehicle for two years at CSTPS Chandrapur./ Rs.7792494.00/- |
| 2 | TECHNICAL/ Rfx No.3000067706/Annual work contract for printing of logbooks, pads & registers as per requirement on as and when basis at CSTPS, Chandrapur as per scope of work./ Rs.15833616.00/- |
| 3 | EM-II/ Rfx No.3000067679/Annual contract for Work of Transportation of LT motors and Removal / fixing of pulley coupling / bearing of HT/LT motors for CSTPS, Chandrapur./ Rs.4350104.20/- |
| 4 | BM-III/ Rfx No.3000067682/Supply of endless rubber belts for Gravimetric coal feeders(36")at Unit-8 & 9 at CSTPS,Chandrapur./ Rs.1055520.00/- |
| 5 | I&C-II/ Rfx No.3000067690/Work contract for servicing of Igniter, Flame Scanners, SADC and power cylinders in ESP, AHP & Coarse ash system during COH of Unit-7./ Rs.626388.00/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 05)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

artson — A TATA Enterprise

## आर्टसन लिमिटेड

(पूर्वीची आर्टसन इंजिनियरिंग लिमिटेड)
सीआयएनः L27290MH1978PLC020644
(टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेडची उपकंपनी)

नोंद. कार्यालयः १४ वा मजला, सिग्नस, प्लॉट क्र. ७१ए, कैलाश नगर, मयूर नगर पासपोली, पवई, मुंबई - ४०००८७
दूर.: +९१ २२-६६२५५६००; ईमेलः investors@artson.net; वेबसाईटः www.artson.net

### टपाल मतपत्रिका सूचना आणि ई-मतदानाची माहिती

कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") च्या कलम १०८ सह वाचावयाचे कलम ११० आणि कायद्याच्या इतर लागू तरतुदी (सध्या अंमलात असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुनर्रचना समाविष्ट), सहवाचिता त्याअंतर्गत वेळोवेळी सुधारित केलेले संबंधित नियम, सेबी (एलओडीआर) विनियमन, २०१५ ("सुचिबद्धता विनियमन") चे विनियमन ४४, आयसीएसआयद्वारे पारित 'सर्वसाधारण सभांविषयीचे सेक्रेटरीयल मानक' ('एसएस-२'), प्रत्येक सुधारित केल्यानुसार), आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ("एमसीए") सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दि. ०८.०४.२०२०, १७/२०२० दि. १३.०४.२०२० सहवाचिता या संदर्भात जारी केलेली इतर संबंधित परिपत्रके, सर्वात अलीकडील परिपत्रक क्र. ०३/२०२५ दि. २२.०९.२०२५ (एकत्रितरित्या 'एमसीए परिपत्रके' असे उल्लेखित) मधील तरतुदींचे पालन करून सर्वसाधारण सभा आयोजित करण्यासाठी/टपाली मतदान प्रक्रिया राबवण्यासाठी विहित केलेल्या आवश्यकतांनुसार, याद्वारे अशी सूचना देण्यात येते की, कंपनीने मंगळवार, २१ एप्रिल २०२६ रोजी, केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे टपाल मतपत्रिका सूचना पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या सूचनेद्वारे ज्यांची नावे सदस्यांची नोंदवही/एनएसडीएल, कंपनीचे निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") कडून प्राप्त झालेल्या लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये समाविष्ट आहेत आणि ज्यांचे ई-मेल पत्ते शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ ("कट-ऑफ दिनांक") रोजी कंपनीकडे उपलब्ध होते, अशा कंपनीच्या सदस्यांची मंजुरी मागितली जात आहे. मतदानाचा अधिकार हा कट-ऑफ दिनांकापर्यंत सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत असलेल्या समभागांच्या भरणा केलेल्या मूल्यावर आधारित मोजला जाईल. त्यानुसार, या टपाली मतदान प्रक्रियेसाठी सदस्यांना सूचनेची भौतिक प्रत किंवा इतर संबंधित अर्ज पाठवण्यात आलेले नाहीत.

सूचनेची प्रत कंपनीची वेबसाईट www.artson.net वर, एनएसडीएलची वेबसाईट www.evoting.nsdl.com वर आणि बीएसई लिमिटेडची वेबसाईट म्हणजेच www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

कृपया नोंद घ्यावी की, कायद्याच्या उपरोल्लेखित तरतुदींचे, सहवाचिता संबंधित नियम, एमसीए परिपत्रके आणि सूचिबद्धता विनियमन, पालन करून, कंपनी आपल्या सदस्यांना त्यांचे मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करण्यासाठी केवळ दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे आणि मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आणि सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी कंपनीने एनएसडीएलची सेवा घेतली आहे. दूरस्थ ई-मतदान गुरुवार, २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ०९:०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, २२ मे २०२६ रोजी सायंकाळी १७:०० वाजता (भाप्रवे) समाप्त होईल. या कालावधीत, 'कट-ऑफ' दिनांकापर्यंत ज्यांच्याकडे कंपनीचे समभाग भौतिक किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आहेत, असे कंपनीचे सदस्य आपले मतदान इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करू शकतात. एखाद्या ठरावावर सदस्याने एकदा मतदान केल्यानंतर, त्यांना त्यानंतर त्यात कोणताही बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

कंपनीच्या संचालक मंडळाने, टपाली मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी, मे. व्हीवायव्ही ॲण्ड कं. एलएलपी, कंपनी सेक्रेटरीज (एलएलपीआयएनः एसीबी - ६५२५) यांची छाननी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे घेण्यात आलेल्या मतदानाचे निकाल, तसेच छाननी अधिकाऱ्याचा अहवाल ई-मतदान संपल्यानंतरच्या २ कामकाजाच्या दिवसांच्या आत जाहीर केले जातील. हे निकाल कंपनीची वेबसाइट www.artson.net आणि एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com वर प्रदर्शित करण्यात येतील.

कोणत्याही चौकशीकरिता, सदस्यांनी www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले भागधारकांसाठी एफएक्यूज आणि सदस्यांसाठी ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पहावी किंवा टोल-फ्री क्रमांक ०२२-४८८६७००० वर संपर्क साधावा किंवा एनएसडीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक श्री. सागर एस. गुढाते यांच्याशी त्यांचा अधिकृत ई-मेल पत्ता evoting@nsdl.com येथे संपर्क साधावा

**आर्टसन लिमिटेड करिता**
सही/-
**दीपक टिबरेवाल**
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी (एफसीएस ८९२५)

दिनांकः २२ एप्रिल, २०२६
ठिकाणः हैदराबाद

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन(पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेलः- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट :- kbmc.gov.in

कुबनप/ई-गव्ह/१८/२०२६-२७ दिनांकः १७/०४/२०२६

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच राज्य शासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. त्यानुसार खालील नमूद कामे करणेकामी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कामाकरिता दरपत्रक दि. २१/०४/२०२६ ते दि. २८/०४/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात एक खिडकी विभागाकडे किंवा kbmc123@gmail.com या Mail ID वर दाखल करावेत. कामाचे स्वरूप व अन्य तपशील संगणक विभागाकडे कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचा कालावधी |
|---|---|---|
| १ | कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या सर्व शाळांमधील biometric attendance system देखभाल दुरुस्ती करणे व तदनुषंगिक साहित्य पुरविणे. | १ वर्ष |
| २ | नव्याने नियुक्त सभापती, पदाधिकारी व मुख्याधिकारी यांचे केबिनसाठी अथवा इतर ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे संगणकीय साहित्य उपलब्ध करून देणे. | १ वर्ष |
| ३ | जनगणना २०२६-२७ करिता घरयादी व घरगणना करणेसाठी घरयादी गटांची निर्मिती तसेच घर क्रमांक देणे करिता अभिकर्ता नेमणूक करणे | ६ महिने |

सही/-
मुख्याधिकारी
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद,
कुळगांव

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### मुदतवाढ सूचना क्र.१०

### ई निविदा सूचना क्र. ५२/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक ०४/११/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक आपलं महानगर, मुंबई, दैनिक सागर, ठाणे, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक एक्टीव टाईम्स, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा उपलब्धता, पुर्व अहर्ता बैठक व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा बाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये कोटी |
|---|---|---|
| १. | शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई चा पुनर्विकास व मऔवि महामंडळाच्या "रतन टाटा उद्योग भवन" (मऔविम मुख्यालय) च्या इमारतीचे अभियांत्रिकी, खरेदी आणि बांधकाम (ईपीसी) करार पध्दतीने बांधकाम करणे. | ₹ ९०३.०८ |

उपरोक्त कामाकरिता निविदा प्रपत्र दिनांक ०९/०६/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

पूर्व अर्हता बैठक दिनांक ११/०५/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता मुख्य अभियंता (मुख्या.), मऔविम, उद्योग सारथी, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३ यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

### मुदतवाढ सूचना क्र.२

### ई निविदा सूचना क्र. ७९/२०२५-२०२६ (मुंबई) करीता

दिनांक २०/०२/२०२६ रोजी दैनिक दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक सागर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | इसाम्बे औद्योगिक क्षेत्र... इसाम्बे औद्योगिक क्षेत्राला वीज पुरवठ्याच्या पायाभूत सुविधा पुरवणे... २२ केव्ही लाईन फीडरचे ०१ चौ. इंचावरून ०.२ चौ. इंचाच्या एसीएसआर कंडक्टरमध्ये अपग्रेडेशन करणे. | ₹ १,२९,७३,८२४.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३०/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

## महाराष्ट्र सागरी मंडळ

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
**दूरध्वनी क्र.** ०२२-६९०४१७७७ **फॅक्स क्र.** ०२२-६९०४१७४०
**Website :** https://mahammb.maharashtra.gov.in **Email:** ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

### ई - निविदा सूचना (सन २०२६-२७)

**Main Portal : https://mahatenders.gov.in**

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामांसाठी बी-१ नमुन्यात ई- निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | कोऱ्या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १. | दाभोळ, ता. दापोली जि. रत्नागिरी व धोपावे, ता. गुहागर जि. रत्नागिरी येथील रो-रो जेट्टी व टर्मिनल इमारतीची दुरुस्ती करणे व तत्सम सुविधा पुरविणे. | २,८३,४५,७०४/- | १,५०,०००/- | २,३६०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| २. | होळी तुळसुंदेवाडी, ता. राजापुर जि. रत्नागिरी येथील रस्त्याची लांबी वाढविणे व मजबुतीकरण करणे. | ३,४०,३९,७७२/- | १,७०,५००/- | २.३६०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३. | जयगड, ता. व जि. रत्नागिरी येथील मुख्य रस्त्यापासुन ते पाईल जेट्टी पर्यंतच्या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ४,००,०९,१३२/- | २,००,५००/- | २,३६०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ४. | चिंचघर वेताळवाडी येथे संरक्षक भिंतीची दुरूस्ती करणे, ता. खेड जि. रत्नागिरी. (द्वितीय निविदा) | ५१,०८,३८६/- | ५१,५००/- | १,१८०/- | १२ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक **२२.०४.२०२६* रोजी १२.००*** वा. ते दिनांक **२९.०४.२०२६* रोजी १७.००* वा.** पर्यंत उपलब्ध होतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**टिप :- वरील कामांपैकी अ.क्र. ०१ ते ०३ ही कामे प्रथम निविदेसाठी तर अ. क्र. ०४ चे काम द्वितीय निविदेसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.**

क्रमांकः आरओसी-२०२६-२७/क्र.५/सी ३४९

ए.ओ. सीआयव्ही. सीओ८०१०४८/२०२६
दिनांकः १८.४.२०२६

### मुंबई येथील उच्च न्यायालयामध्ये अपीलीय बाजू, दिवाणी अधिकारक्षेत्र

**अंतरिम अर्ज क्र. १५०५० वर्ष २०२४**
**सह**
**आदेश क्र. ८४४ वर्ष २०२४ विरुद्ध अपील**

न्यायाधीश, न्यायालय कक्ष क्र. ४६, शहर दिवाणी न्यायालय, बृहन्मुंबई यांच्या द्वारे पारित निवाडा आणि आदेश दिनांक ३१ ऑगस्ट, २०२४ विरुद्ध दाखल, दावा क्र. १६५/२०२३ मधील कारणे दाखवा नोटीस क्र. ७१८/२०२३ (सीएनआर क्र. एमएचसीसी०१-००२००२-२०२३.).

१) आसिफ अब्दुल सत्तार ... याचिकाकर्ता
विरुद्ध
१) गनी हाजी जेठा आणि अन्य ... प्रतिवादी

प्रति,

प्र. क्र. २ : अस्लम अमजद खान,
पत्ता : राहणार - भाड्याची खोली क्र. २०/२१, ३रा मजला, झैनब मंझिल, ३०-३४, नारायण धुरू स्ट्रीट, पायधुणी, मुंबई - ४०० ००३.
आणि
पत्ता : सदनिका क्र. ८/१, जुनी टाटा कॉलनी, बीकेसीजवळ, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

**ज्याअर्थी** उपरोल्लेखित अर्जदारांनी त्यांच्या ॲडव्होकेट सौ. प्रिती जोशी यांच्याद्वारे उपरोल्लेखित **अपील आदेश क्र. ८४४/२०२४ विरुद्ध** सादर केले आणि सदर न्यायालयाने दि. १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रतिवादी क्र. २ ला नोटीस पारित करण्याचे आदेश दिले, त्यानुसार प्रतिवादी क्र. २ ला पारित केलेली सूचना वितरित न होता "प्रतिवादी क्र. २ बऱ्याच काळापूर्वी जागा सोडली आहे आणि सध्याचा ठावठिकाणा माहीत नाही" अशा बेलीफच्या टिप्पणीसह परत आली.

**त्यानंतर**, अंतरिम अर्ज क्र. १५०५०/२०२४ (निर्देशांकरिता) सह सदर आदेश क्र. ८४४/२०२४ मधील अपील आदेशाकरिता न्यायालयासमोर ठेवण्यात आले आणि जेव्हा कु. प्रिती शुक्ला आय/बी प्रिती जोशी याचिकाकर्त्याकरिता ॲडव्होकेट/उपस्थित अर्जदार यांची सुनावणी झाल्यावर, जेव्हा न्यायालयाने (**समक्षः फरहान पी. दुबाश, न्यायाधीश**) यांनी दि. ०९.०३.२०२६ रोजी व्यापक वितरण असलेल्या दोन वृत्तपत्रांमध्ये जाहीर सूचनेद्वारे पर्यायी सेवेद्वारे प्रतिवादी क्र. २ला प्र. क्र. २ च्या अंतिम ज्ञात पत्त्यावर वितरित करण्याचे निर्देश दिले.

म्हणून, कृपया नोंद घ्यावी की, आदेश क्र. ८४४/२०२४ विरुद्धच्या अपिलाची सुनावणी **दि. ०४.०५.२०२६** किंवा सदर माननीय न्यायालयास सोयिस्कर वाटेल अशा कोणत्याही पुढील दिनांकास ठेवण्यात येईल आणि जर तुमच्या वतीने व्यक्तिशः किंवा सदर न्यायालयाच्या योग्यरित्या प्राधिकृत आणि तुमच्याद्वारे निर्देशित ॲडव्होकेटद्वारे उपस्थित न राहिल्यास, तुमच्या अनुपस्थितीमध्ये अंतिम सुनावणी आणि निश्चिती करण्यात येईल.

**साक्षीदार श्री. श्री चंद्रशेखर माननीय मुख्य न्यायाधीश, मुंबई दि. ०९.०३.२०२६** रोजी.

दिनांकः /०४/२०२६

सही/-
(श्री. अमोल भूमे)
लिपिक

सही/-
(श्रीमती मनिषा एम. टेंबुरकर)
विभाग अधिकारी

शिक्का

न्यायालयाच्या आदेशाद्वारे
सही/-
(अस्मिता ई. गोटेकर)
**सहाय्यक निबंधक**
(दिवाणी)

# चंदेरी च्वींगम

नवाकाळ
मुंबई । बुधवार
२२ एप्रिल, २०२६
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in





## रामगोपालांचा पुन्हा अंडरवर्ल्ड राग

**प्रसिद्ध** दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी 'चोरी चोरी चुपके चुपके' या चित्रपटाच्या निर्मितीदरम्यान उद्‌भवलेल्या वादावर भाष्य करताना, त्या काळातील चित्रपटसृष्टी आणि अंडरवर्ल्ड यांच्यातील कथित संबंधांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. लेखक हुसेन झैदी यांना दिलेल्या मुलाखतीत वर्मा यांनी या प्रकरणातील विविध पैलू उलगडून सांगितले.

या प्रकल्पात फायनान्सर भरत शहा यांचा समावेश कसा झाला, याबद्दल बोलताना वर्मा म्हणाले की, एका व्यक्तीने शहा यांना आपल्याकडे सलमान खानच्या तारखा असल्याचे सांगितले होते. याची खात्री करण्यासाठी शहा यांनी थेट सलमानशी संपर्क साधला असता, त्यानेही या वृत्ताला दुजोरा दिला. या खात्रीनंतरच भरत शहा यांनी या चित्रपटात गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला. मात्र, कालांतराने या चित्रपटाचे निर्माते नाझीम रिझवी यांचे छोटा शकीलशी संबंध असल्याचे समोर आले. वर्मा यांच्या मते, भरत शहा यांना वाटले की ते कायदेशीर व्यवसाय करत आहेत आणि निर्मात्याचे काही अंडरवर्ल्डशी संबंध असतील तर त्याचा त्यांच्याशी काय संबंध? ते स्वतः गुन्हेगार नसून केवळ एका अशा व्यक्तीशी जोडले गेले होते जिचे गुन्हेगारी जगताशी संबंध होते. त्या काळात चित्रपटसृष्टीत खंडणीचे प्रकार सर्रास घडत असत. वर्मा यांनी एका घटनेचा उल्लेख केला जिथे एका व्यावसायिकाकडे ५ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती.






## 'किंग'साठी महाकाय व्यवहार

**सिनेसृष्टीतील** सर्वात बहुप्रतिक्षित चित्रपटांपैकी एक असलेल्या 'किंग' बाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. शाहरुख खान आणि सिद्धार्थ आनंद यांच्या या चित्रपटासाठी पेन मरुधर या वितरण संस्थेने तब्बल २५० कोटी रुपयांचा ऐतिहासिक थिएट्रीकल करार केला आहे. ४०० कोटी रुपयांच्या अवाढव्य बजेटमध्ये तयार होणारा हा चित्रपट नाताळच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार असून, भारतीय चित्रपट व्यापारातील हा या वर्षातील सर्वात मोठा व्यवहार मानला जात आहे.

'पेन मरुधर' या संस्थेचे शाहरुख खानच्या 'रेड चिलीज एंटरटेनमेंट'सोबत जुने आणि यशस्वी संबंध आहेत. यापूर्वी त्यांनी 'जवान', 'डंकी', 'झिरो' आणि 'बदला' यांसारख्या चित्रपटांच्या वितरणाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. यंदा 'किंग' समोर हॉलिवूडमधील 'ॲव्हेंजर्स: डूम्सडे', 'ड्यून ३' आणि 'जुमानजी' यांसारख्या मोठ्या चित्रपटांचे आव्हान असणार आहे. या स्पर्धेत आपल्या चित्रपटाला जास्तीत जास्त चित्रपटगृहे आणि शो मिळावेत, यासाठी शाहरुख खानने एका अनुभवी वितरण भागीदाराची निवड केली आहे.

## अविनाश-इम्तियाज पुन्हा एकत्र



**अभिनेता** अविनाश तिवारी आणि प्रसिद्ध दिग्दर्शक इम्तियाज अली हे 'लैला मजनू' या चित्रपटानंतर आता 'ओ साथी रे' या आगामी वेब मालिकेच्या निमित्ताने पुन्हा एकदा एकत्र येत आहेत. अविनाशच्या मते, ही मालिका त्याच्या कारकिर्दीतील आतापर्यंतची सर्वात कठीण भूमिका आहे. 'नेटफ्लिक्स'वर प्रदर्शित होणाऱ्या या मालिकेत इम्तियाज अली यांनी प्रेमाच्या पारंपारिक आणि समकालीन भावनांचा शोध घेतला आहे.

अविनाश म्हणतो, इम्तियाज यांच्यामुळे मी बाह्य रूपाच्या पलीकडे जाऊन पात्राच्या आंतरिक भावविश्वात शिरायला शिकलो. 'ओ साथी रे' मध्ये आम्ही शरीराच्या पलीकडे जाऊन मनाचा शोध घेतला आहे. ते अशा थरांना स्पर्श करतात, ज्याची जाणीव स्वतः कलाकारालाही नसते. या मालिकेत अविनाश तिवारीसोबत अदिती राव हैदरी आणि अर्जुन रामपाल यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत.

## 'कृष्ण'च्या टीझरची चर्चा का?




**जिओ** स्टुडिओ आणि कलेक्टिव्ह स्टुडिओच्या हिस्ट्रीव्हर्सने लास वेगासमध्ये आयोजित एनएबी शो २०२६ मध्ये त्यांच्या आगामी 'कृष्ण' या चित्रपटाचा टीझर सादर केला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन मनू आनंद यांनी केले असून, हा चित्रपट भारतीय चित्रपट निर्मितीच्या तंत्रज्ञानात एक मोठी क्रांती घडवून आणणारा ठरणार आहे.

चित्रपटाची निर्मिती पारंपारिक व्हीएफएक्स किंवा ॲनिमेशनऐवजी पूर्णपणे एआय आधारित तंत्रज्ञानावर करण्यात आली आहे. कलेक्टिव्ह आर्टिस्ट नेटवर्कच्या गॅलरी ५ या व्यासपीठाचा वापर करून ही निर्मिती केली गेली आहे, ज्याला मायक्रोसॉफ्ट अझरच्या प्रगत एआय आणि क्लाऊड तंत्रज्ञानाची जोड लाभली आहे. मायक्रोसॉफ्टच्या मुख्य कार्यक्रमात या चित्रपटाचा 'फर्स्ट लूक' दाखवण्यात आला, जिथे एआयचा प्रत्यक्ष चित्रपट निर्मितीमध्ये प्रभावी वापर करणारी एक महत्त्वाची संस्था म्हणून कलेक्टिव्हचा गौरव करण्यात आला. हा चित्रपट हिस्ट्रीव्हर्सचा एक भाग असून, या अंतर्गत काली, कर्ण आणि दुर्गा यांसारख्या भारतीय पौराणिक आणि ऐतिहासिक पात्रांवर आधारित महत्त्वाकांक्षी चित्रपट मालिका तयार केली जाणार आहे.


## 'कारा'चा थरारक ट्रेलर



**दिग्दर्शक** विघ्नेश राजा यांच्या 'कारा' या आगामी चित्रपटाचा थरारक ट्रेलर प्रदर्शित झाला असून, यामध्ये अभिनेता धनुष एका आगळ्यावेगळ्या भूमिकेत दिसत आहे. १९९० च्या दशकातील आखाती युद्ध आणि त्यानंतर उद्‌भवलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर या चित्रपटाची कथा आधारलेली आहे. 'पोर तोझिल'या अत्यंत गाजलेल्या चित्रपटानंतर विघ्नेश राजा आता एक वास्तववादी आणि व्यावसायिक धाटणीचा थरार घेऊन येत आहेत.

चित्रपटात धनुषने करासामी ऊर्फ कारा ही व्यक्तिरेखा साकारली आहे, जो आपल्या गुन्हेगारी भूतकाळापासून दूर जाण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र, आखाती युद्धामुळे निर्माण झालेली आर्थिक टंचाई आणि परिस्थिती त्याला पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या वाटेवर वळण्यास भाग पाडते. धनुषच्या विरोधात एका कणखर पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दाक्षिणात्य अभिनेता सूरज वेंजारामूडू (भरतन) दिसणार आहे. हा चित्रपट ३० एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

## 'हाय जवानी...'साठी व्यावसायिक खेळी





**रमेश** तौरानी यांच्या 'टिप्स फिल्म्स'ने त्यांच्या आगामी 'हाय जवानी तो इश्क होना है' या चित्रपटाच्या अखिल भारतीय वितरणासाठी पीव्हीआर-आयनॉक्स आणि सिनेपोलिस या देशातील दोन प्रमुख मल्टिप्लेक्स साखळ्यांशी हातमिळवणी केली आहे. डेव्हिड धवन दिग्दर्शित हा ४६ वा चित्रपट असून, यामध्ये वरुण धवन, पूजा हेगडे आणि मृणाल ठाकूर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट एक निखळ विनोदी मनोरंजन असणार असल्याचे सांगितले जाते. अनेक चित्रपटांच्या गर्दीत आपल्या चित्रपटाला योग्य प्रदर्शनाची जागा मिळावी, यासाठी ही एक व्यावसायिक खेळी मानली जात आहे. या करारामुळे मोठ्या शहरांतील महत्त्वाच्या मल्टिप्लेक्स केंद्रांवर या चित्रपटाला जास्तीत जास्त शो मिळण्यास मदत होईल. मल्टिप्लेक्स साखळ्यांनी ठराविक संख्येने शो देण्याचे आश्वासन देऊन हे वितरण हक्क मिळवले आहेत. दुसरीकडे, पारंपरिक बाजारपेठांमध्ये टिप्स फिल्म्स जुन्या वितरण पद्धतीनुसार स्वतःच चित्रपट प्रदर्शित करणार आहे. तौरानी यांनी आपल्या महत्त्वाकांक्षी चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी घेतलेला हा निर्णय अत्यंत विचारपूर्वक असल्याचे दिसते. हा चित्रपट २२ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार असून, त्याची टक्कर 'चांद मेरा दिल' या चित्रपटाशी होईल.

---

## मुंबई विद्यापीठात प्रश्नपत्रिका फुटीने खळबळ! अभाविप आक्रमक

■ मुंबई

**मुंबई** विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या सहाव्या सत्रातील प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणामुळे खळबळ उडाली. यासंदर्भात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर प्रकाराबाबत दोषींवर तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली.

बांद्रा येथील आर. डी. नॅशनल महाविद्यालयात १५ एप्रिल रोजी प्रश्नपत्रिका फुटीचा प्रकार उघडकीस आला. तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या तीन विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच बाहेर आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या घटनेमुळे परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

यासंदर्भात अभाविपने नमूद केले की, या प्रकरणातील प्रत्येक जबाबदार व्यक्ती, विद्यार्थी, अधिकारी किंवा प्रशासकीय यंत्रणा यांच्यावर तत्काळ गुन्हे दाखल करून कारवाईची मागणी केली. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला.

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील भंगार गोदामाला भीषण आग

■ वसई

**मुंबई**-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या पेल्हार येथील खान कंपाऊंडमध्ये असलेल्या भंगार गोदामात भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. ही घटना आज सकाळी ९ च्या सुमारास घडली. या आगीत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नसून मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गालगत मागील काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्र विस्तारले आहे. आज सकाळी नालासोपारा पूर्वेच्या पेल्हार परिसरातील खान कंपाऊंडमधील ए.के. इंटरप्रायझेस (गोदाम क्र. ७) या औद्योगिक गोदामाला अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीचे स्वरूप इतके रौद्र होते की, काही वेळातच आगीच्या ज्वाळांनी संपूर्ण गोदामाला वेढले.

या घटनेची माहिती मिळताच वसई-विरार शहर महापालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळवले. या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

## टॅक्सी ३० फूट खोल विहिरीत कोसळली ! दोघांची सुटका

■ वसई

**नालासोपाऱ्यात** एक टॅक्सी थेट ३० फूट खोल विहिरीत कोसळली. अग्निशमन दलाच्या जवानांनी विहिरीत उतरून टॅक्सीतील दोघांची सुखरूप सुटका केली. या दुर्घटनेत चालकासह त्याचा सहकारी जखमी झाला असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

काल दुपारी १२ च्या सुमारास नालासोपारा पूर्वकडील वालईपाडा येथील संतोषी माता मंदिराजवळून जाणारी एक टॅक्सी रस्त्याकडेला असलेल्या विहिरीत कोसळली. टॅक्सी कोसळल्याचा आवाज होताच स्थानिक नागरिक मदतीसाठी धावले. उन्हाळ्याचे दिवस असल्याने विहिरीत पाणी नव्हते. बचावासाठी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. विहीर सुमारे ३० ते ४० फूट खोल होती. अग्निशमन दलाच्या जवानांनी विहिरीत शिडी उतरवली. विहिरीत अडकलेल्या टॅक्सीमधील दोघांना सुरक्षापट्ट्यांच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. त्यांना किरकोळ दुखापत झाली असून, उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## डोळखांबला बिबट्याच्या हल्ल्यात दहा वर्षांच्या बालकाचा मृत्यू

■ ठाणे

**शहापूर** तालुक्यात डोळखांब वनपरिक्षेत्रातील कळभोंडे लाद्याचीवाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात एका दहा वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. कृष्णा भागा आगीवले असे या बालकाचे नाव आहे.

सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गावाजवळ दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घातली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथे बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. त्यामुळे बिबट्यांकडून माणसांवर हल्ले होण्याच्या घटना वाढल्या आहेत. मात्र वन विभाग काहीही उपाय योजना करताना दिसत नाही. त्यामुळे स्थानिकांमध्ये वन विभागाच्या विरोधात प्रचंड नाराजी आहे.

## वसईच्या चार किनारपट्टीवरील धूपप्रतिबंधक किनारे रखडले

**शेती व निसर्गसंपदेचे मोठे नुकसान**

■ वसई

**वसईच्या** ४ किनारपट्टीवरील धूपप्रतिबंधक बंधाऱ्यांचे काम रखडले आहे. किनारपट्टी नियमन क्षेत्राची (सीआरझेड) परवानगी न मिळाल्याने कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. यामुळे यंदाही उधाणाच्या लाटांचा तडाखा कोळीवाड्यांना आणि किनारपट्टीवरील शेतीला बसण्याची भीती निर्माण झाली आहे.

वसईच्या समुद्र किनाऱ्यावर धूपप्रतिबंधक बंधारा नसल्याने किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात येणाऱ्या उधाणाच्या भरतीवेळी या किनारपट्टीच्या भागात मोठमोठ्या लाटा किनाऱ्यावर आदळून घराचे, शेतीचे याशिवाय किनाऱ्यावरील निसर्गसंपदेचेही मोठे नुकसान होत असते. हे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत भुईगाव, रानगाव, पाचूबंदर- लांगेबंदर, नवापूर अशा चार समुद्र किनाऱ्यांवर धूप प्रतिबंधक बंधारे तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यासाठी ३० कोटींचा निधीही मंजूर करण्यात आला होता.

सेंट्रल वॉटर अँड पॉवर रिसर्च स्टेशन यांच्याकडून सागरी पूरसंरक्षक बांधाचा आराखडा मंजूर झाला आहे. मात्र किनारपट्टी नियमन क्षेत्राची (सीआरझेड) परवानगी अजूनही मिळाली नाही नसल्याने प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात किनारपट्टीला मोठा धोका निर्माण झाला आहे.

## शेतातील झाडाला गळफास मायलेकराची आत्महत्या

■ पुणे

**इंदापूर** तालुक्यात सराफवाडीत मायलेकराने शेतातील दोन झाडांना गळफास घेऊन आत्महत्या केली. सकाळी ही घटना उघडकीस आली.

आत्महत्या केलेल्या या मायलेकराची नावे- सुमन तुकाराम जाधव (६३) व अतुल तुकाराम जाधव (३५) अशी आहेत. वालचंदनगर पोलिसांनी सांगितले की, तुकाराम जाधव यांची पत्नी सुमन जाधव व मुलगा अतुल जाधव यांनी सकाळी सहा पूर्वी शेततळ्याजवळ लिंबाच्या व आंब्याच्या झाडाला गळफास लावून घेतला. गावकऱ्यांनी हे मृतदेह पाहिल्यानंतर पोलिसांना कळवले. त्यांच्या आत्महत्येने सराफवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## भाजपा नगरसेवकावर बलात्काराचा गुन्हा तक्रारदार महिलेवरही खंडणीचा गुन्हा

■ भाईंदर

**मिरा**-भाईंदर महापालिकेतील भाजपा नगरसेवक लक्ष्मण जंगम यांच्याविरोधात मिरा रोड पोलीस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जंगम यांच्या तक्रारीवरून संबंधित महिलेविरोधातही खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

४० वर्षीय तक्रारदार महिला सामाजिक कार्यकर्ती आहे. तिने सोमवारी प्रभाग क्रमांक १२ चे भाजपा नगरसेवक लक्ष्मण जंगम (६०) यांच्या विरोधात २०२२ पासून लग्नाचे आमिष दाखवून बलात्कार केल्याचा आरोप केला आहे. तिच्या तक्रारीवरून मिरा रोड पोलिसांनी जंगम यांच्या विरोधात मिरा रोड पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

काल रात्री उशिरा जंगम यांनी देखील पीडित महिलेविरोधात नवघर पोलीस ठाण्यात खंडणी मागितल्याची तक्रार दाखल केली. या महिलेबरोबर कामानिमित्ताने ओळख झाली होती. मात्र तिने माझ्याकडे ३ बीएचकेचा फ्लॅट, दुकान आणि पाव किलो सोन्याची मागणी केली. त्यासाठी ती मला वारंवार फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत होती, असे या तक्रारीत म्हटले आहे. जंगम यांच्या तक्रारीवरून नवघर पोलिसांनी या पीडित महिलेविरोधात खंडणीचा गुन्हा दाखल केला.

## वसईत मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू होणार

■ वसई

**मत्स्यउद्योगाला** चालना देण्यासाठी वसईत मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू केले जाणार आहे. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी हे केंद्र सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.

वसई-विरारमध्ये मोठ्या प्रमाणावर मत्स्य व्यवसाय होतो. त्यामुळे वसईत मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. या संदर्भात वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांनी मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर राणे यांनी प्रशिक्षण केंद्रासाठी तातडीने जागा निश्चित करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकल्पासाठी 'मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजने'अंतर्गत निधी उपलब्ध केला जाणार आहे. यासाठी समन्वयकाची नियुक्ती केली जाणार आहे.

## बाह्य यंत्रणेद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा प्रभावीपणे राबवा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम व परिणामकारक करण्यासाठी बाह्य यंत्रणेद्वारे दिल्या जाणाऱ्या सेवांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. बाह्य यंत्रणेद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा आढावा घेण्यासाठी आयोजित



बैठकीत आबिटकर बोलत होते.


यावेळी आबिटकर म्हणाले, राज्यातील आरोग्य संस्थांनी तपासण्यांसाठी बाह्य संस्थांवर अवलंबून न राहता 'इन-हाऊस' चाचण्या वाढवून स्वयंपूर्ण व्हावे. अनावश्यक तपासण्या टाळाव्यात. तसेच बाह्य संस्थांकडून होणाऱ्या तपासण्यांच्या गुणवत्तेची नियमित पडताळणी करावी. रुग्णांना वेळेत तपासणी अहवाल मिळणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासाठी आरोग्य उपसंचालकांनी सुस्पष्ट धोरणात्मक आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. गावपातळीवर हृदयविकाराच्या संबंधित (STEMI) प्रकल्प प्रभावीपणे राबवण्यावरही भर देऊन योजनेचा प्रसार करण्याचे निर्देश मंत्री आबिटकर यांनी दिले.

## तिसरी मुंबईसाठी ऑनलाईन भूसंपादन प्रक्रिया सोमवारपासून

■ मुंबई

**मुंबई** महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून तिसऱ्या मुंबईसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. अटल सेतू प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या या नव्या शहरासाठी जमीन मालकांची संमती घेण्याची प्रक्रिया सोमवार २७ एप्रिलपासून सुरू होणार आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नवी मुंबईकडील प्रभाव क्षेत्रात रायगड जिल्हातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील तब्बल १२४ गावांचा समावेश आहे. सुमारे ३२३.४४ चौ. किमी क्षेत्रफळावर नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रात तिसरी मुंबई वसवली जाणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य सरकारने १६ मार्च रोजी भूसंपादन व भूवाटप धोरण जाहीर केले आहे. त्यानुसार प्रकल्पग्रस्तांना सिडको आणि एमआयडीसीच्या धर्तीवर २२.५ टक्के विकसित भूखंडाचा परतावा, रोख भरपाई किंवा एफएसआय/टीडीआरच्या स्वरूपात मोबदला देण्याचा निर्णय घेतला आहे.

## नवाकाळ शब्दकोडे १५८३



### आडवे शब्द -

१. नामकरण ४. अढळपदाचे वरदान मागणाऱ्या ध्रुवबाळाचे वडील असलेला राजा ७. छोट्या प्रमाणात उत्पादन करणारा व कमी विस्तार असलेला उद्योग, घरगुती उद्योग १०. चांगली बुद्धी, मुलींचे एक जुने नाव ११. व्याघ्र १२. लहान तंबू १३. क्षुद्र माणूस, समाजात काहीच किंमत नसलेला १६. निर्झर, ओढा १७. संघर्ष, आंदोलन १९. रक्तवाहिनी २०. वार्ताहर, बातमीदार २२. राजीनामा देणे, पद सोडणे २४. गर्जना, आरोळी २६. इच्छा, मुलींचे एक नाव २७. त्वरेने, भराभर २८. नाशवंत, झीज होणारे २९. सडपातळ व बांधेसूद ३२. ग्लानी, बेशुद्धी ३३. अशक्त, कमजोर ३५. आसपास ३८. फिकीर ४०. भीती ४१. संकट ४२. ज्याची कोणाशी तुलना शक्य नाही असा ४४. विहीर ४५. तांबडी माती, काव ४६. जोडीदार ४७. कैवार ४८. होडके ५०. टीकेचा भडिमार ५१. अस्थिभंगाच्या तपासणीसाठी उपयोगी किरण ५२. घायपात ५३. सोन्या-चांदीचा धागा ५४. सोटा ५६. पलायन ५७. रणगाड्यावरील शस्त्र ५९. गणगोत ६०. मृत्तिका ६१. हळुवार आंदोलन ६३. फसवेगिरी ६६. सावकाश ६७. अरण्य ६८. शिखर ६९. नाराजी ७३. गहिरे ७५. नेत्र, डोळे ७६. दृष्टी ७८. मनाची अस्वस्थता ७९. रानरेडा ८१. गुह्य ८२. पिता ८४. शोले सिनेमात ठाकूरचे गाव ८६. वय वाढलेली उपवर मुलगी ८८. धूम्र ८९. हूल ९०. समज, भान ९२. वर्तुळ ९३. तुळईला/छताला आधार देणारा खांब ९५. नमस्कार ९६. लक्ष, समग्र अवधान ९७. किरण ९८. मालक ९९. अर्धचंद्र १००. सोंगटी १०१. गाढव १०२. वार्ताहर १०३. चोळीचे कापड

### उभे शब्द -

१. अगदी नावापुरते २. मृदा ३. जाड, धिप्पाड ४. पावसाची अल्प विश्रांती ५. नाश पावलेला ६. धाक ७. कपटी ८. रुष्टता ९. स्त्रियांचा गळ्यातला दागिना ११. डावा १३. पतीचा भाऊ १४. इमारतीचा समोरचा भाग १५. पलंगपोस १६. चमकणारे, प्रकाशित १८. तलवारीपासून रक्षण करणारे आयुध १९. असंमती २०. वाटसरू २१. स्त्री २३. खोडकर २५. चिन्ह ३०. अतिशय अशक्त ३१. मनमिळाऊ स्वभावाचा ३३. भगवान विष्णूचे विश्रांतीस्थान ३४. कामापुरता मामा अन ××××× ×× (एक म्हण) ३५. प्रयत्नावाचून प्राप्त झालेला ३६. उद्यान ३७. लोककथेत याला देवाने सोन्याची आणि चांदीची कुऱ्हाड बक्षीस दिली ३९. पिछाडीला ४३. माळ ४९. देखणा ५२. एकरूपता, एकतानता ५३. आय, उत्पन्न ५४. दात घासण्याचे चूर्ण ५५. थेट आचेवर भाजली जाणारी पोळी ५८. परिणाम, यश ५९. घड्याळ दुरुस्त करणारा ६२. स्पष्ट शब्दात चूक दाखवून देणे ६३. दूर ६४. वक्रता ६५. ठाऊक असलेले ६९. ऊस ७०. दात घासण्याची राख ७१. उष्ण ७२. मधुमेह ७४. सोन्या-चांदीची कांब ७५. चामडे ७७. थोडासा ८०. अनिश्चितता, शंका ८१. एक हलके तृणधान्य ८२. पाट्याबरोबरचे साधन ८३. बाल्य ८५. गणपती ८६. घोड्यावर आरूढ ८७. वस्ती ८९. झोपेची पेंग ९१. गणपती ९४. शेवया आणि आईस्क्रीम एकत्र •

### नवाकाळ कोडे क्रमांक १५८२ चे उत्तर

**आडवे शब्द** : १. अंगारक ४. आमरस ७. वाळीत टाकणे १०. नकुल ११. बिनधास्त १२. लक्तरे १४. वश १५. नीला १६. मग १७. मालदार १८. बल १९. थोर २१. राठ २२. आप २३. बालीश २४. तमा २६. जमीनदोस्त २८. साप २९. जेवण ३०. दर्या ३१. मखमल ३२. मर्दन ३४. शुक ३६. धनको ३८. रत ४०. फोल ४०अ. हकीम ४२. दंभ ४४. लढवय्या ४५. मटार ४७. कातर ४८. कडवा ५०. हस्तिनापूर ५१. नीर ५३. झणझणीत ५७. खर ५८. डूल ६०. बडगा ६१. नूपुर ६३. मालमत्ता ६५. हजार ६९. शैल ७०. रीत ७१. भित्रीभागूबाई ७५. स्वदेश ७७. ताफा ७९. हेका ८०. वळ ८१. श्वसन ८३. वहाण ८४. केशर ८६. रस ८८. शर ८९. साथ ९०. सपक ९२. फसगत ९४. झाड ९५. विशाल ९६. हाडवैर ९९. सामिष १००. बहाणेबाजी १०१. मानवंदना

**उभे शब्द** : १. अंकुश २. गाल ३. कबिला ४. आधार ५. मस्त ६. सलग ७. वारेमाप ८. तगादा लावणे ९. कमी १०. नवजात १३. कलश १५. नीरज १६. मठ १८. बलीवर्द २०. जून २१. रास्त २२. आपमतलबी २५. मादक २६अ. मीन २७. दोहन २८. साखर ३२. मलम ३३. नगर ३४. शुक्लकाष्ठ ३५. वाकी ३७. कोदंड ३९. आवरण ४०अ. हर हर महादेव ४१. मल्लिनाथी ४३. भवानी ४६. टाक ४८. करडू ४९. गुणी ५२. रबर ५३. झगा ५४. झब्बा ५५. तनू ५६. धूर ५७. खल ५९. लहरी ६२. पुच्छ ६३. मार्ग ६४. भलता ६६. जात ६७. अभाव ६८. अंबा ७१. भिकार ७२. गूळ ७३. ईश्वर ७४. मानखंडना ७६. शहानिशा ७८. फाके पडणे ८२. कसाबसा ८५. शक ८७. सफर ८८. शत ९१. चीड ९३. गहन ९५. विष ९५अ. लब ९६. हाजी ९७. वैध ९८. गोंद

# देशात रेकॉर्ड होईल इतके मतदान करा

पान १ वरून

त्यांनी सुंदर शहर बनवले. त्यांनी आणखी अनेक कामे हाती घेतली होती. ती कामे आता त्यांच्याच तडफेने, गुणग्राहकतेने वहिनींच्या नेतृत्वात पूर्ण होतील. फडणवीस यांच्या आधी सुनेत्रा पवार यांचे भाषण झाले. त्याआधी अजित पवार यांच्यावरील वीस मिनिटांची चित्रफीत पाहून त्या भावूक झाल्या. आपल्या भाषणात सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अजितदादांच्या शिवाय सभा घ्यावी लागेल असे कधी वाटले नाही. दादांनी अपार कष्ट करून ही बारामती उभी केली. आज बारामतीमधील आबाल-वृद्ध अजूनही शोकाकूल आहेत. दादा आपल्यात नाही यावर विश्वास बसत नाही. मात्र अजितदादा आपल्यात नाही हे कटू सत्य आपल्याला स्वीकारावे लागेल. बारामतीला देशात एक नंबरचा तालुका बनवणे हे अजितदादांचे स्वप्न होते. दादांनी बारामतीला राज्याचे विकासाचे मॉडेल बनवले. त्यामुळे बारामतीकरांच्या मनात अजितदादांच्यासाठी अपार श्रद्धा आहे. ही केवळ साथ नाही, तर भावनेने बांधलेली घट्ट नाळ आहे आणि हीच ताकद आहे. दादांच्या पुण्याईनेच आज मी इथे उभी आहे. फक्त उमेदवार म्हणून नाही, दादांची स्वप्न घेऊन उभी आहे. ही लढाई सोपी नाही, पण मला विश्वास आहे की, माझ्या पाठीशी बारामतीकरांची ताकद आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. मी तुमचा विश्वास कधीच कमी होऊ देणार नाही. दादांची जागा कोणीच घेऊ शकत नाही, पण त्याच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा मी प्रयत्न करेन. दुःखाला कवटाळून न बसता मी विकासकामासाठी अजितदादांच्या पावलावर पाऊल ठेवून चालेन. मी एका संघर्षयोद्धाची सहचारिणी आहे. येसुबाई जशा लढल्या, अहिल्याबाई होळकरांनी जसा कारभार चालवला आणि आपल्या लोकांना न्याय दिला, त्याच पद्धतीने मी तुमची सेवा करेन.

बारामतीत दादांच्या नावाने म्युझियम बनवण्याची घोषणाही सुनेत्रा पवार यांनी आपल्या भाषणात केली. त्या म्हणाल्या की, दादांच्या आयुष्याचा पट या म्युझियममध्ये पाहायला मिळणार आहे. ती केवळ आठवण असणार नाही, तर तो अखंड प्रेरणास्त्रोत असेल.

**सुनेत्रावहिनींना लागेल ती मदत करू! सुप्रिया पवार**

या सभेला खा. सुप्रिया सुळे यादेखील उपस्थित होत्या. मात्र, आपले भाषण झाल्यावर त्या निघून गेल्या. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या की, बारामती आणि पवार यांचे नाते वेगळेच आहे. बारामतीने सहा दशके पवारांना निवडून दिले आहे. आधी पवारसाहेब आणि नंतर ३५ वर्षे अजितदादांनी बारामतीची सेवा केली आहे. बारामतीने कधीच पवारांची साथ सोडली नाही. हा रेकॉर्ड आताही कायम राहणार आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हायला पाहिजे होती. परंतु काही उमेदवार रिंगणात आहेत. मात्र, सुनेत्रावहिनींसाठी विक्रमी मतदान होईल यात शंका नाही. दादांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी लागेल ती मदत आम्ही सुनेत्राताईंना करू. बारामतीची आन-बान-शान पूर्ण करण्याची जबाबदारी पार पाडू.

### दादांच्या अपघाताविषयीच्या सर्व शंकांचे निरसन व्हावे

अजित पवार यांच्या बारामतीत झालेल्या अपघाताबद्दल बोलताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, तुमच्या दादांच्या मनात जशा शंका आहेत, तशाच माझ्या मनात आहेत. अपघाताविषयीच्या सर्व शंकांचे निरसन झाले पाहिजे. अपघाताच्या चौकशीसाठी मी पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन विनंती केली आहे. विविध यंत्रणा आणि उच्चस्तरीय अधिकारी त्याची चौकशी करत आहेत. जे कोणी दोषी असतील त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, हीच माझीदेखील भावना आहे. सुनेत्रा पवार यांच्या भाषणातील हाच संदर्भ पकडत मुख्यमंत्री फडणवीस यांनीदेखील यावर भाष्य केले. ते म्हणाले की, दादांच्या अपघाताबद्दल मलाही मनातून वाटते की, यातील सत्य बाहेर आले पाहिजे. सगळे सत्य बाहेर येत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार नाही.

# लातूरमध्ये उष्णतेचा तडाखा उष्माघाताने शेतकऱ्याचा मृत्यू

लातूर

**लातूर** जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या प्रखर उन्हामुळे उष्माघाताचा पहिला बळी गेल्याची घटना झाली. निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील शेतकरी लक्ष्मण दादाराव भंडारे (६०) यांचा शेतात काम करताना उष्णतेचा झटका आल्याने मृत्यू झाला.

लक्ष्मण भंडारे हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करत होते. गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानाचा पारा ४२ अंशांच्या पुढे गेला आहे. कडक उन्हात राबत असताना अचानक जमिनीवर कोसळले.

शेतात उपस्थित असलेल्या इतरांनी तातडीने त्यांना औराद खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी निलंगा येथे हलविण्याचा सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला. निलंग्याकडे नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी सांगितले की, दिवसभर उन्हात काम केल्याने त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात घटले होते. त्यामुळे तीव्र उष्माघाताचा झटका बसला. वेळेत शरीराला विश्रांती आणि पुरेसे पाणी न मिळाल्याने प्रकृती अधिक बिघडली आणि त्यांचा मृत्यू झाला. मृत लक्ष्मण भंडारे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, पाच मुली, सून आणि नातू असा परिवार आहे.

# ॲपल सीईओ पदाचा टिम कुकचा राजीनामा

पान १ वरून

समुदायाला उद्देशून लिहिलेल्या पत्रात टिम यांनी म्हटले आहे की, ॲपलचा सीईओ असणे हे जगातील सर्वोत्तम काम होते. ॲपल वापरणाऱ्या लोकांकडून मला अनेक ईमेल आणि संदेश मिळायचे. तुम्ही तुमच्या आयुष्यातील छोटे-छोटे क्षण माझ्यासोबत शेअर केले. ॲपलने तुमच्या जीवनावर कसा परिणाम केला हे मला सांगितले. ॲपलने ग्राहकांचे जीवन अधिक चांगले बनवले याचा अभिमान वाटतो. लोकांच्या कल्पनाशक्तीला प्रेरणा देणाऱ्या आणि जीवन समृद्ध करणाऱ्या कंपनीचे नेतृत्व करण्याचा मान मला मिळाला. हा खरोखरच सन्मान आणि विशेषाधिकार आहे. टर्नस यांच्या नेतृत्वाखाली ॲपल नव्या उंचीवर पोहोचेल. हा निरोप नाही, तर एका संक्रमणाचा क्षण आहे. पत्राच्या शेवटी कुक यांनी सर्व ॲपल वापरकर्त्यांचे आभार मानले.

**PUBLIC NOTICE**

Notice hereby given that the owner of Flat No. 202, Second Floor, area admeasuring 500 Sq. Ft. Built Up, in building known as 'SYPRIEAN APARTMENT', in the SYPRIEAN Co.-Op. Hsg. Soc. Ltd. Manickpur, Vasai West, Tal- Vasai, Dist- Palghar 401202. Lt. Baptist Francis Pereira passed away on 15/01/2024. Leaving behind following legal heirs 1. Lt. Tereza Baptist Pereira (Wife) passed away on 15/04/2005 2. Mr. Boniface Baptist Pereira (Son). The legal heir intends to transfer his name on the Share certificate and other related documents of the said Flat. Invites any claims of objections in writing for Transfer of Share Certificate and other related documents in the name of the legal heir. within the period of 14 days from the publication of this notice on the address given below. If no claims/ objections are received during this period, it shall be presumed that no one has any objection/claims to Transfer the Share Certificate in the name of Legal heir of the Deceased member. Address - Adv. Brinston J. Pereira, Ushakaal, Sambodi, Agashi, Virar (W), Tal - Vasai, Dist- Plaghar 401301.

**Adv. Brinston J. Pereira**

# इराण-अमेरिका दुसऱ्या फेरीतील चर्चा अधांतरीच

पान १ वरून

अशी धमकी ट्रम्प यांनी पुन्हा एकदा दिली.

ट्रम्प यांच्या धमक्या सुरू असताना तिकडे इराणही आपल्या भूमिकेपासून तसूभरही मागे हटण्यास तयार नाही. ट्रम्प यांच्या धमक्यांना आम्ही घाबरत नाही. आमच्या हिताच्या आड येणारी कोणतीही अट आम्ही मान्य करणार नाही, असे इराणच्या रिव्हॉल्युशनरी गार्डचे कमांडर मेजर जनरल अहमद वाहिदी यांनी पुन्हा एकदा ठणकावून सांगितले. अमेरिकेशी वाटाघाटी करण्याच्या मुद्यावरून इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाघर घालिबाफ आणि वाहिदी यांच्यात मतभेद असल्याचे आधीच स्पष्ट झाले आहे. या साऱ्या तणावामुळे इराणमधील परिस्थितीही चिंताजनक बनली आहे. इंटरनेट मॉनिटरिंग संस्था नेटब्लॉक्सने दिलेल्या माहितीनुसार इराणमध्ये मागील ५३ दिवसांपासून इंटरनेटवर सरकारने निर्बंध लागू केले आहेत. सध्या केवळ ठराविक लोक आणि संस्थांनाच इंटरनेट सुविधा दिली जात आहे. सर्वसामान्य जनतेचा जगापासून संपर्क जवळपास तुटल्यात जमा आहे. त्याचे प्रतिकूल परिणाम दैनंदिन जीवनावरच नव्हे तर व्यापार आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही होत आहेत. एका बाजूने वाटाघाटींमधून शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न आणि दुसऱ्या बाजूने एकमेकांना दिल्या जाणाऱ्या धमक्यांचे सत्र सुरूच असल्यामुळे अविश्वास आणि अंतर्गत दबावामुळे संपूर्ण मध्य पूर्वेत अस्थिरता पसरली आहे.

# सरकारी कर्मचारी, नर्स यांचा बेमुदत संप! कामकाज ठप्प

पान १ वरून

ठोस निर्णय न झाल्याने अखेर बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचे समन्वय समितीचे निमंत्रक भास्कर गव्हाणे यांनी मागण्या मान्य होईपर्यंत संप सुरू राहणार असल्याचे सांगितले. राज्य सरकारने या संपाची गंभीर दखल घेत कर्मचाऱ्यांना कामावर परतण्याचे आवाहन केले आहे. अत्यावश्यक सेवा कायद्यांतर्गत कारवाईचा इशाराही कर्मचाऱ्यांना दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच या प्रश्नावर तोडगा काढतील, अशी प्रतिक्रिया सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे यांनी दिली आहे.

# मध्य रेल्वेची वाहतूक सलग २ दिवसात ३ वेळा विस्कळीत

पान ८ वरून- नेमली असून अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. त्यानंतर आज पुन्हा मध्य रेल्वेची वाहतूक पुन्हा विस्कळीत झाली. त्यामुळे दिवा आणि ठाणे स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी झाली. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस दिशेने जाणाऱ्या अप मार्गावरील लोकल गाड्या २० ते २५ मिनिटे उशिराने धावत होत्या. खर्डी परिसरात रात्री घेतलेला ब्लॉक सकाळी ३ वाजता संपणे अपेक्षित होते, मात्र तो सकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहिल्याने लोकल आणि एक्सप्रेस गाड्यांवर परिणाम झाला. ऐन गर्दीच्या वेळेत झालेल्या या विलंबामुळे कामावर आणि महाविद्यालयात जाणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले. दुपारनंतर काही प्रमाणात वाहतूक सुरळीत झाली, मात्र त्यानंतर पुन्हा एक तांत्रिक बिघाड सीएसएमटी स्थानकात झाला. दुपारी ३.१८ वाजताच्या सुमारास बदलापूरहून येणारी एक जलद लोकल चुकीने प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर वळवली गेली, जिथे आधीच दुसरी लोकल उभी होती. दोन्ही गाड्या एकाच ट्रॅकवर समोरासमोर आल्याचे लक्षात येताच मोटरमनने तातडीने ब्रेक लावला आणि मोठा अपघात टळला. या घटनेनंतर प्लॅटफॉर्म ५ ते ८ दरम्यानची वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली. संबंधित लोकल सुरक्षितपणे मागे घेण्यात आली व त्यानंतर हळूहळू वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

**मध्य रेल्वे**

**सर्वसमावेशक वार्षिक देखभाल कंत्राट**

**खुली निविदा सूचना क्र.** बीबीएमएलटीटीसी५२सीसीटीव्हीसीएएमसीव्हीओएलर२ दिनांक १७.०४.२०२६, **कामाचे नाव व ठिकाणः** मध्य रेल्वेच्या लोकमान्य टिळक टर्मिनस कोचिंग डेपो येथे देखभाल करण्यात येत असलेल्या एलएचबी एसी कोचेसमधील सीसीटीव्हीकरिता एक वर्षाच्या कालावधीसाठी सर्वसमावेशक वार्षिक देखभाल कंत्राट (सीएएमसी). **कामाचे अंदाजित मूल्यः** रु. ३५,८०,७७४.४० (रुपये पस्तीस लाख ऐंशी हजार सातशे चौऱ्याहत्तर व पैसे चाळीस मात्र) **पूर्ततेचा दिनांकः** १२ महिने, **बोली सुरक्षाः** रु. ७१,६००/- (रुपये एकाहत्तर हजार सहाशे मात्र) **निविदा सादरीकरण बंद होण्याचा दिनांक आणि वेळः** दि. ०९.०५.२०२६ रोजी ११.०० वा.पर्यंत. निविदा फक्त वेबसाईट **www.ireps.gov.in** द्वारे ई-टेंडरिंग स्वरुपात स्वीकारण्यात येईल. निविदा दस्तऐवज वेबसाईटमध्ये उपलब्ध आहेत. **"सदर निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७/दिनांक १५.०६.२०१७चे अनुपालन करते."** DE-68

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

# मराठी भाषा अनिवार्य करण्याला विरोध रिक्षाचालकांचे ४ मे पासून आंदोलन

पान १ वरून

अट आणि इतर नियम पूर्ण करतात. मात्र, ॲग्रिगेटर कॅब सेवा आणि ई-बाईक टॅक्सींसाठी असे कठोर नियम लागू नाहीत. त्यामुळे हा निर्णय अन्यायकारक आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, हा २०१९चा शासनाचा निर्णय आहे. तो मागे घेण्याचा अधिकार माझ्याकडे नसून कॅबिनेटकडे आहे. चालक राज्यात जर इतकी वर्षे काम करत असतील तर त्यांना मराठी येणे आवश्यक असून, यामध्ये काही चुकीचे आहे, असे मला वाटत नाही. महाराष्ट्रात व्यवसाय करायचा आणि गुणगान मात्र हिंदीचे गायचे, हे योग्य नाही. इतर राज्यांत हिंदी बोलली जाते का? मग महाराष्ट्रात मराठीचा अभिमान बाळगणे चुकीचे कसे? प्रादेशिक परिवहन विभागामार्फत १ मेपासून सुरू होणारी मोहीम पुढेही कायम राहणार आहे. मीरा-भाईंदर शहरात मराठी न येणाऱ्या चालकांची छाननी सुरू असून, २९ एप्रिलला अहवाल मिळणार आहे. त्यानंतर ३० एप्रिलला आरटीओ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहे.

# बेकारीने मरण्यापेक्षा दुबईत मरू

पान १ वरून

संयुक्त महाराष्ट्र आला. सरकारला कामगारांचे हे महत्त्व कळत नाही. एकीकडे कामगारांच्या बाजूने बोलायचे आणि दुसऱ्या बाजूला कामगारांचे वाटोळे करून टाकायचे हे राज्यकर्त्यांचे लक्षण नाही. उद्धव ठाकरे यांनी यावेळी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांचेही कौतुक केले. ते म्हणाले, पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी एकट्या वाघिणीसारख्या लढत आहेत. त्या जिंकल्याच पाहिजेत. त्या एका महिलेला हरवण्यासाठी जवळपास २ लाखांहून सीआरपीएफचे जवान तैनात केलेत. मणिपूर जळत होते, तेव्हा ३० हजार होते. आता बंगालमध्ये निवडणूक आहेत म्हणून २ लाख जवान तैनात करण्यात आलेत. काही तर ५ लाख जवान उतरवल्याचा दावा करत आहेत. या स्थितीत मतदान होणार कसे? कोण करणार? नाक्यानाक्यावरच्या फौजा पाहून तुमची मतदानाला जायची हिंमत आहे का? उद्या त्यांनी ठप्पे मारले आणि ममता हरल्या, तर हे तंगड्या वर करून नाचणार. ही लोकशाही आहे? मुख्यमंत्री तिकडे जाऊन प्रचार करत आहेत आणि इकडे राज्यात ड्रगचे रॅकेट सुरू झाले. महिलांचा विनयभंग होत आहे. भोंदूगिरी वाढली, पण आम्हाला त्याचे काहीच नाही. आम्हाला फक्त बंगाल जिंकायचाय अशी त्यांची भूमिका आहे. कामगार ओरडत आहे, त्यांच्याकडे कुणीही लक्ष देत नाही, असे ठाकरे म्हणाले

देशात काही राज्य कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम यशस्वीपणे राबवत आहेत. डिलिमिटेशन अर्थात मतदारसंघ पुनर्रचनेमुळे या राज्यांचे संसदेतील प्रतिनिधित्व कमी झाले असते. सरसंघचालक मुले जन्माला घालण्याचा सल्ला देत आहेत. पण त्यांना पोसणार कोण? आज सगळे देशोधडीला लागलेत. देश तुम्हाला नुसता बेकारांचा कारखाना करायचाय का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांचे बुरखे फाडण्याचा इशारा देत आहेत. अरे, आम्ही हिंदू आहोत. तुम्ही आम्हाला बुरखे कुठे घालता. तुमच्याच डोक्यावर बुरखा आहे. आमच्या नाही. पण लोकसभेत जे काही झाले, ते मुख्यमंत्र्यांनी पाहिले का? विरोधकांवर महिला आरक्षणाला विरोध केल्याचा आरोप केला जात आहे. पण महिला आरक्षण आत्तापासून जाहीर करा, हे माझेच स्टेटमेंट आहे. महिला आरक्षणाच्या आडून सरकार देशाचे तुकडे पाडणार होते, देशाची वाट लावणार होते. त्याचे हे कुभांड विरोधकांनी कसे फोडले, त्यांचा पराभव करून ही लोकशाही वाचवली.

**जाहीर सूचना**

माझे अशील जलाराम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स एलएलपी यांच्या सूचनांनुसार, मी याखालील उल्लेखित अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेल्या मालमत्तेच्या शीर्षकाची तपासणी करीत आहे.

कोणी व्यक्ती, बँक किंवा वित्तीय संस्थांचा सदर मालमत्तेच्या संदर्भात गहाणवट, धारणाधिकार, हिस्सा, विक्री, परवाना, भेट, ताबा किंवा बोजा यामार्गे किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा हक्क असल्यास किंवा सदर मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात कोणताही दावा, हक्क, शीर्षक आणि हितसंबंध करीत असल्यास त्यांनी त्याबाबत सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्याचा/तिचा/त्यांचा तो दावा(दावे) व त्यासह सर्व सहाय्यक दस्तऐवज यांसह सूचित करावे, असे न केल्यास असे मानण्यात येईल की, कोणताही वैध दावा अस्तित्वात नाही आणि/किंवा पक्षकारांनी मालमत्तेमधील त्यांचे सर्व दावे सोडून दिले आहेत आणि मालमत्ता बोज्यांपासून मुक्त आहे.

**वरील उल्लेखित अनुसूचीः**

मुंबई उपनगरच्या नोंदणीकरण जिल्ह्यामधील मुंबई उपनगरामधील चंदावरकर रोड, ऑफ एस. व्ही. रोड, बोरीवली (पश्चिम), गाव बोरीवली, तालुका बोरीवली येथे स्थित वसलेल्या आणि स्थित असलेल्या आणि वसलेल्या, नगर नियोजन योजना बोरीवली। अंतर्गत मोठा भूखंड क्र. ६ आणि वितरित अंतिम भूखंड क्र. ३९, सुसंगत सी.टी.एस. क्र. ५७९, ५७९/१, ५७९/२, ५७९/३, ५७९/४ आणि ५७९/५ चा भाग असलेल्या आणि पूर्वी कुंजविहार सोसायटी लेआऊट असे ओळखल्या जाणाऱ्या भूखंड क्र. ४ धारण केलेल्या आणि मालमत्ता कार्डनुसार एकूण मोजमाप ३५७.८२ चौ.मी. असलेल्या जमिनीचे सर्व खंड आणि तुकडे व त्यासह त्यावर उभी तळमजला अधिक एक वरील मजला समाविष्ट असलेली इमारत "प्रेमराज भूवन" आणि चतुःसीमा खालीलप्रमाणेः


| | |
|---|---|
| उत्तरेस किंवा त्या दिशेने | : सीटीएस क्र. ५८६ धारण केलेला भूखंड |
| दक्षिणेस किंवा त्या दिशेने | : सीटीएस क्र. ५८० धारण केलेला भूखंड |
| पूर्वेस किंवा त्या दिशेने | : सीटीएस क्र. ५७८ धारण केलेला भूखंड |
| पश्चिमेस किंवा त्या दिशेने | : सीटीएस क्र. ५८२ धारण केलेला भूखंड |

सही/-
धवल एम. संगानी
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
५०२, ५वा मजला, गांजावाला रेसिडेन्सी, गांजावाला लेन, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२.

ठिकाणः मुंबई
दिनांकः २२.०४.२०२६

# रत्नागिरीच्या समुद्रात सापडले प्रकाश निर्माण करणारे जिवाणू

**रत्नागिरी**- कोकणातील रत्नागिरीच्या समुद्रात स्वत:चा प्रकाश निर्माण करणारे जिवाणू सापडले आहेत. गुजरातच्या वडोदरा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाचा एक भाग असलेल्या पादरा येथील एम.के.अमीन कॉलेजच्या दोन



विद्यार्थ्यांनी या सागरी जीवाचा शोध लावला आहे. अर्णव धामधरे आणि हरिओम पाठक अशी या दोन संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. बी.एस्सी. मायक्रोबायोलॉजीचे हे दोघे विद्यार्थी आहेत. या दोघांनी समुद्राच्या पाण्यात असे जिवाणू शोधले आहेत, जे अंधारात प्रकाश उत्सर्जित करतात. या जिवाणूंना 'बायोल्युमिनेसेंट बॅक्टेरिया' (जैविक प्रकाशमान जिवाणू) म्हटले जाते. गुजरातच्या विद्यार्थ्यांनी केलेले हे संशोधन शैक्षणिक आणि वैज्ञानिक जगात चर्चेचा विषय बनला आहे.

**पोस्ट पटली म्हणून शेअर केली, पण मुस्लीम महिलांनाही घरातूनच अनेक त्रास सहन करावे लागतात जसे एकाशी लग्न झालं.... त्याला नाही पटलं .. तीन शब्दांत तलाक... नंतर चुलत.. मावस... मामा काका कोणाशीही निकाह लावुन दिला जातो.. कमी वयात कितीतरी मुलं....अजूनही अनेक बाबी.**

# स्वातंत्र्य आणि शालिनता

**अगदीच** या महिलांचेच उदाहरण घ्यावे अस नाही, पण हिंदु मुलींनी जरा तारतम्य बाळगावं... एवढीच अपेक्षा.....

प्रश्न असा होता...

मुस्लीम महिला लव्ह जिहाद आणि बलात्काराला बळी का पडत नाहीत?

याची कारणे अशी आहेत:

पहिले म्हणजे, मुस्लीम महिलांना त्यांच्या मर्यादा माहीत असतात...

त्या शालीनता जपतात.

त्या सार्वजनिक ठिकाणी (बाजारात, सामूहिक मेळाव्यात) विनाकारण अनोळखी लोकांशी हसत नाहीत किंवा बोलत नाहीत.

त्यांचे कपडे शालीन असतात आणि तरीही त्या काळा बुरखा घालतात, ज्यामुळे त्या पुरुषांना आकर्षित करत नाहीत. एखादी मुस्लीम महिला डॉक्टर असो वा वकील, कितीही उच्च पदावर असली तरी, ती आपल्या धर्माच्या आज्ञांचे उल्लंघन करत नाही आणि नेहमी हिजाब घालते. याउलट, हिंदू महिलांना लग्नसमारंभात आणि इतर सामाजिक कार्यक्रमांमध्ये छोटे ब्लाऊज, कमरेखालील साड्या घालणे आणि आपले शरीरप्रदर्शन करणे ही अभिमानाची गोष्ट वाटते.



बाजारातील गोलगप्पा विक्रेता, फेरीवाला, भाजी विक्रेता किंवा इतर कोणताही दुकानदार तुमच्या कृतींकडे कुठून आणि कसे पाहत असेल, याची तुम्ही कल्पनाही करू शकत नाही. जर त्यांनी तुम्हाला अडवले, तर त्यांचे स्वातंत्र्य धोक्यात येते. स्वातंत्र्याचा अर्थ असा नाही की तुम्ही तुमचे शरीर दाखवावे! याचा अर्थ असा नाही की, सर्व दोष तुमचाच आहे. पण नकळतपणे का होईना, तुम्हीच याला प्रोत्साहन देत आहात. हिंदू स्त्रियांना पुरुषांसारखे सर्व काही करावे लागते: त्यांचा छळ करणे, रात्री उशिरापर्यंत बाहेर राहणे, दारू पिणे, सिगारेट ओढणे आणि पुरुषांसारखे सर्व काही करणे (अश्लील वर्तन).

मुस्लीम स्त्रिया आपल्या मुलींनाही हेच शिकवतात. त्या तरुण मुलींना अयोग्य कपडे घालण्यापासून आणि इतर धर्माच्या लोकांशी मिसळण्यापासून परावृत्त करतात. याच कारणांमुळे मुस्लीम स्त्रिया आणि मुली सुरक्षित राहतात. स्त्रीचा सन्मान तिच्याच हातात असतो. स्त्री स्वतःला जसे संरक्षण देऊ शकते, तसे संरक्षण दुसरे कोणीही देऊ शकत नाही.

स्त्रीशक्तीचा विजय असो.

हा लेख समाजमाध्यमांवर व्हायरल झाला आहे, या लेखाशी नवाकाळ संपादक सहमत असतीलच असे नाही.

# परतवाडा लैंगिक शोषण आरोपींच्या कोठडीत वाढ

■ अमरावती

**परतवाडा** येथील लैंगिक शोषण आणि अश्लिल चित्रफित प्रकरणी मुख्य आरोपी आयान अहमदसह चार आरोपींच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. न्यायालयाने त्यांची कोठडी २७ एप्रिलपर्यंत वाढवली आहे. आरोपीच्या मोबाईलमधील डेटा त्यांच्याच समक्ष तपासण्यासाठी आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी सरकारी पक्षाने त्यांची पोलीस कोठडी वाढविण्याची मागणी केली होती. परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी आयान अहमद तन्वीर अहमद, उजैर खान इक्बाल खान, मोहंमद साद मोहंमद साबीर, तरबेज खान तस्लीम खान यांची कोठडी वाढविण्यात आली आहे.

# मध्य रेल्वेची वाहतूक सलग २ दिवसात ३ वेळा विस्कळीत

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ डोंबिवली

**डोंबिवली** रेल्वे स्थानकात काल सकाळी रिकाम्या लोकलचा एक डबा रुळावरून घसरल्याने मध्य रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली होती. ही घटना ताजी असतानाच, आज पुन्हा दिवसभरात दोन वेळा मध्य रेल्वेची सेवा खोळंबल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. स्थानकांवर प्रचंड गर्दी उसळली होती. या

**सीएसएमटीत दोन लोकल समोरासमोर**



घटनेचे व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने संबंधित स्टेशन मास्तरवर निलंबनाची कारवाई केली. काल सकाळी डोंबिवली स्थानकाजवळ लोकलचा एक डबा रुळावरून घसरला होता. विशेष म्हणजे त्याआधीच तब्बल दहा तासांचा मेगा ब्लॉक घेऊन रुळांची दुरुस्ती आणि नवीन स्लीपर बसवण्यात आले होते. तरीही अपघात कसा घडला, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणाची दखल घेत मध्य रेल्वे प्रशासनाने चार वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती

» पान ७ वर

# बंगालला लष्करी छावणीचे रूप तृणमूल संतप्त! उद्या मतदान

■ कोलकाता

**बंगालमध्ये** केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या सर्व युनिट अभूतपूर्व बैठक कोलकात्यात झाल्याने केंद्र आणि राज्यातील संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. निवडणुकीआधीच बंगालमध्ये २.४ लाख सीएपीएफ (केंद्रीय सशस्त्र पोलीस दल) जवान म्हणजे (२,४०० कंपन्या) तैनात करण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यातील सुमारे ३.४ कोटी मतदारांच्या तुलनेत साधारण प्रत्येक १४० मतदारांमागे एक सीएपीएफ जवान तैनात आहे. जम्मू-काश्मीरमधील बुलेटप्रूफ दंगानियंत्रण वाहनेही बंगालमध्ये पाठवण्यात आली आहेत. निवडणूक प्रचार आज थांबल्यानंतर या प्रचंड बंदोबस्तामुळे मतदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सत्ताधारी तृणमूल काँग्रेसने आरोप केला आहे की गेल्या आठवड्यात कोलकात्यात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या सर्व युनिटची बैठक झाली. या बैठकीत सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी आणि एसएसबीचे प्रमुख जमले होते. शेकडो जवानांही हजर होते. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या मोठ्या बैठकीमुळे केंद्र आणि बंगाल सरकारमधील तणाव आणखी वाढला आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीतील केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या सर्व प्रमुखांची अशी संयुक्त बैठक यापूर्वी कधीही विधानसभा निवडणुकांच्या काळात झाली नव्हती. मतदान २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत होणार आहे.

# डॉ. वळसंगकर आत्महत्या प्रकरण मनीषा मानेचा दोषमुक्ती अर्ज फेटाळला

■ सोलापूर

**सोलापुरातील** प्रसिद्ध न्युरोफिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या या प्रकरणातील आरोपी मनीषा माने-मुसळेचा दोषमुक्तीचा अर्ज सोलापूर जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळला. त्यामुळे या प्रकरणात आरोपीवर चालणारी कायदेशीर प्रक्रिया कायम राहणार आहे.

१८ एप्रिल २०२५ रोजी डॉ. शिरीष वळसंगकर यांनी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केली होती. घटनेपूर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. या चिठ्ठीच्या आधारे पोलिसांनी त्यांच्या रुग्णालयात कार्यरत असलेल्या मनीषा माने-मुसळे हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. या घटनेमुळे सोलापूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. तपासादरम्यान मनीषा माने-मुसळे हिने आपण निरपराध असल्याचा दावा करत दोषमुक्तीसाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या पुराव्यांचा विचार करून न्यायालयाने हा अर्ज फेटाळून लावला.

# भाजपातील एक गट नरेंद्र मोदींना पदावरून दूर करण्याच्या प्रयत्नात

**संजय राऊतांचा खळबळजनक दावा**

■ मुंबई

**भाजपातील** एक गट नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदावरून दूर करण्याच्या प्रयत्नात आहे, असा खळबळजनक दावा उबाठाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी आज केला. हा दावा करताना त्या गटात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आहेत किंवा नाहीत हे आपल्याला माहीत नाही, अशी पुस्तीही राऊत यांनी जोडली.

संसदेत महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्याबद्दल बोलताना राऊत यांनी गृहमंत्री अमित शहा यांच्यावर निशाणा साधला. मुळात ते महिला आरक्षण विधेयक नव्हतेच. ते डिलिमिटेशन (मतदारसंघ पुनर्रचना) विधेयक होते. अमित शहा यांनी त्या विधेयकाला गुलाबी साडी नेसवून महिला आरक्षण असे नाव देऊन संसदेत आणले. याचे संपूर्ण सूत्रधार अमित शहाच होते. त्यांनी सर्व पक्षांच्या बहुतांश नेत्यांना फोन करून विधेयकाला पाठिंबा देण्याची विनंती केली होती. त्याचवेळी विधेयकाला पाठिंबा देऊ नका, असे सांगणारे फोन कॉलही भाजपामधूनच केले गेले होते, असा दावाही राऊत यांनी केला.

# शेअर बाजारात जबरदस्त तेजी सेन्सेक्स ७५३ अंकांनी वधारला

■ मुंबई

**भारतीय** शेअर बाजारात आज जबरदस्त तेजी दिसून आली. सकाळी बाजार सुरू होताच वाहू लागलेले तेजीचे वारे बाजार बंद होईपर्यंत कायम राहिले. तेजीच्या या लाटेत मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ७५३ अंकांनी वधारून ७९,२७३ अंकांवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी २११ अंकांच्या वाढीसह २४,५७६ अंकांवर बंद झाला.

आजच्या तेजीमध्ये बँकिंग क्षेत्रातील समभागांचे मोठे योगदान राहिले. आयसीआयसीआय बँक (२.४१ टक्के), एचडीएफसी बँक (२.०४), ॲक्सिस बँक (१.७२), एयू स्मॉल फायनान्स बँक (४.२७) या समभागांनी जबरदस्त कामगिरी केली. याव्यतिरिक्त आयडीएफसी फर्स्ट बँक आणि कोटक महिंद्रा बँक यांचे समभागही वाढीसह बंद झाले. बँकिंगसोबतच ट्रेन्ट, हिंदुस्थान युनिलिव्हर आणि टीसीएस यांसारख्या समभागांनीही चांगली कामगिरी केली.

# महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदारसंघ फोडण्याचा प्रयत्न

**आ. रोहित पवारांचा आरोप**

■ पुणे

**राष्ट्रवादी** शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन महिला आरक्षण आणि मतदारसंघ फेररचनेशी संबंधित घटना दुरुस्ती विधेयकावर सादरीकरण केले. यावेळी त्यांनी २०२३ मध्ये मंजूर झालेले महिला आरक्षण विधेयक हे प्रत्यक्षात महिलांना न्याय देण्यासाठी नसून, मतदारसंघांची पुनर्रचना (डिलिमिटेशन) करून स्वतःच्या फायद्यासाठी खासदार वाढवण्याचा भाजपाचा छुपा अजेंडा असल्याचा आरोप केला.



ते म्हणाले की, २०२३ मध्ये मंजूर झालेल्या विधेयकावरून सिद्ध होते की, भाजपाला आपल्या सोयीनुसार मतदारसंघ तोडायचे आहेत. पिंपरीच्या वॉर्ड २४ मध्ये ज्याप्रमाणे एससी वॉर्ड जनरल करण्यात आला, तो भाजपाच्या 'सोयीचे पिच' तयार करण्याच्या प्रयत्नाचा भाग आहे. या प्रक्रियेत २०११ ची जनगणना का ग्राह्य धरली नाही? २००१ ची लोकसंख्या का विचारात घेतली जात आहे? २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपा अब की बार ४०० पार म्हणत होते. इतक्या जागा निवडून आल्या असत्या तर त्यांनी संविधान बदलले असते. खासदारांची संख्या वाढवण्याचा प्रयत्न हा संविधान बदलण्यासाठीच चालू होता.

# मुंबई कोकण मजूर सहकारी संघातर्फे शुक्रवारी सहकारी संस्थांचे प्रशिक्षण शिबीर

■ मुंबई

**मुंबई** कोकण विभागीय मजूर सहकारी संघातर्फे शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.३० ते

**मंत्री शिवेंद्रराजे भोसलेंच्या हस्ते होणार उद्घाटन**

२.३० या वेळेत सहकारी संस्थांचे प्रशिक्षण शिबीर पार पडणार आहे. या शिबीराचे उद्घाटन राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र गृहनिर्माण स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर असतील. दादर (पूर्व) येथील कोहिनूर मंगल कार्यालय येथे होणाऱ्या या कार्यक्रमाला मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आयोजक व मुंबई कोकण विभागीय मजूर सहकारी संघाचे अध्यक्ष सुनिल बांबूळकर, उपाध्यक्ष सुहास गमरे, सचिव लक्ष्मण आंगणे, संचालक प्रभू बिरादार, शशीकांत पाध्ये, बाळकृष्ण साळुंखे, अनिल गडकर, दादासाहेब इंगळे, दिनकर मोहिते, श्रीकांत राणे, मोहन शेट्टी, रेणुका कांबळे, स्वाती करांडे, मोहन अंधेरे यांनी दिली.



आदि शंकराचार्य यांची १२३८ वी जयंती मुंबईतील माटुंगा येथील श्री शंकर मठात मोठ्या उत्साहात साजरी केली. देशातील एकमेव मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मठात आदि शंकराचार्यांची मुख्य मूर्ती असल्याचे मानले जाते. माटुंगा मठात ११ दिवसांचा विशेष उत्सव सुरू असून, यात होम, सुवासिनी पूजा, पादपूजा, गायत्री होम, रुद्राभिषेक, हळदी-कुंकू आणि अन्नदान यांसारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

# पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या आदिलला एकनाथ शिंदेंनी घर बांधून दिले

■ पहलगाम

**महाराष्ट्राचे** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काश्मीरमधील पहलगाम येथील दहशत हल्ल्यात शहीद झालेल्या आदिलला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी घर बांधून दिले. त्यांनी आदिल हुसेन शाह याच्या कुटुंबाला दिलेला शब्द पाळला. आज एका विशेष कार्यक्रमात हे नवनिर्मित घर आदिलच्या कुटुंबाकडे सुपूर्द करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभाग घेतला.

आदिलचे मूळ गाव हपतनार, पहलगाम येथे हे घर बांधण्यात आले आहे. या घरासाठी सुमारे १२ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममधील बैसरन खोऱ्यात पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला होता. आदिल हा घोडेवाला होता. पर्यटकांना वाचवताना व दहशतवाद्यांशी लढा देताना तो शहीद झाला. गेल्या वर्षीच एकनाथ शिंदे यांनी आदिलच्या कुटुंबाला ५ लाख रुपयांची वैयक्तिक आर्थिक मदत दिली होती आणि त्यांना घर बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. हे घर बांधण्यासाठी शिंदे गट शिवसेना कार्यकर्ते आणि 'सरहद' या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. आदिलच्या वडिलांनी शिंदे यांचे आभार मानताना म्हटले की, माझ्या मुलाने माणुसकीसाठी आपल्या प्राणाची आहुती दिली आणि शिंदेंनी दिलेला शब्द पाळला.

# 'पनीर' कशापासून बनवले! मेन्यू कार्डात उल्लेख अनिवार्य

**राज्य सरकारचा निर्णय**

■ मुंबई

**राज्य** सरकारने यापुढे हॉटेल, रेस्टारंट आणि फास्ट फुड विक्रेत्यांना पनीरचे पदार्थ विकत असताना स्पष्टपणे दुधापासून तयार झालेले 'पनीर' असा उल्लेख मेनू कार्डमध्ये करणे बंधनकारक केले आहे. जर एखादा हॉटेलचालक चीज ॲनालॉग पनीर विकत असेल तर तसा उल्लेख मेनू कार्डवर करावा लागणार आहे, असा आदेश राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाने दिला आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्यावतीने एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, रेस्टॉरंट आणि हॉटेल्समध्ये ग्राहकांची



दिशाभूल होत असल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत. पनीर फक्त दुधापासून आणि ॲनालॉग वेगळ्या घटकांपासून तयार होत असते. त्यामुळे आता रेस्टॉरंट, हॉटेल्सला बिल, मेनूकार्डवर 'चीज, पनीर ॲनालॉग' स्पष्ट नमूद करणे बंधनकारक असणार आहे. चीज ॲनालॉगवर उत्पादक, पुरवठादारांनीही योग्य लेबलिंग करणे आवश्यक आहे. लेबलिंग आणि माहिती न दिल्यास कायदेशीर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला. अन्न सुरक्षा व मानके (अन्नपदार्थ मानके व अन्न मिश्रित पदार्थ) विनियम,२०११ मधील विनियम २.१.१ नुसार 'पनीर' हा केवळ दुधापासून बनविलेला पदार्थ आहे.

# चौथीतील विद्यार्थ्याचा हृदयविकाराने मृत्यू

■ चंद्रपूर

**चंद्रपूर** जिल्ह्यातील देलनवाडी येथे अवघ्या १० वर्षांच्या चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत मुलाचे नाव ईशान सत्यपाल आत्राम असून, तो लोकमान्य टिळक प्राथमिक विद्यालय येथे इयत्ता चौथीत शिक्षण घेत होता. ईशान आज सकाळी नेहमीप्रमाणे शाळेत जाण्यासाठी उठला होता. आंघोळ आटोपून शाळेचा गणवेश परिधान करत असताना अचानक त्याच्या छातीत तीव्र वेदना सुरू झाल्या. काही क्षणातच तो जमिनीवर कोसळला. त्यानंतर त्याच्या आई-वडिलांनी त्याला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. खेळण्या-बागडण्याच्या वयातच त्याचा अकाली मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मुंबई पोलिसांच्या पथकात २१ प्रशिक्षित घोडे दाखल

**मुंबई पोलिसांच्या गस्ती पथकाला बळकट करण्यासाठी, राजस्थान, हरियाणा आणि केरळमधून आणलेले २१ नवीन प्रशिक्षित घोडे मरोळ पोलीस कॅम्पमध्ये दाखल झाले आहेत. जुहू, गिरगाव, गोराई, अक्सा आणि उत्तनसारख्या गर्दीच्या समुद्रकिनाऱ्यांवर आणि दुर्गम भागात करडी नजर ठेवण्यासाठी या घोड्यांचा वापर केला जाणार आहे.**



■ मुंबई

**ब्रिटिश** काळातील परंपरेनुसार आता पुन्हा एकदा पोलीस खात्यात अश्वदल सक्रिय करण्यात आले आहे. हे घोडे हरियाणा, राज्यस्थान व केरळ राज्यातून आणले आहेत. काल गिरगाव चौपाटीवर ताफ्यातील दोन घोड्यांना सरावासाठी आणण्यात आले होते. या घोड्यांना जुहू, अक्सा, उत्तन, गोराई बीच व गिरगाव चौपाटीसह अन्य चौपाट्यांवर गस्त घालण्यासाठी तैनात करण्यात येणार आहे. १ मे रोजी महाराष्ट्रदिनी छत्रपती शिवाजी महाराज मैदानावरील परेडमध्ये हे घोडे पाहायला मिळणार आहेत.